मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २२७ ■ मंगळवार, २८ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# बदलत्या काळातील गुन्ह्यांचे आव्हान स्वीकारण्यासाठी सज्ज होऊन काम करण्याची गरज – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ३६ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा-२०२६ चा समारोप

**मुंबई :** महाराष्ट्र पोलीस दलाने बदलत्या काळातील सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांसारख्या आव्हानांना सामोरे जात अधिक सज्जतेने काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

कलिना येथील सशस्त्र पोलीस मुख्यालयाच्या क्रीडांगणावर ३६ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा-२०२६ च्या समारोप व बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, गृहराज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोईर,



गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते तसेच मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र पोलीस दल देशातील सर्वाधिक व्यावसायिक आणि सक्षम दलांपैकी एक असून कायदा व सुव्यवस्था टिकवून ठेवण्यात त्यांचे योगदान मोलाचे आहे. राज्याच्या औद्योगिक व आर्थिक प्रगतीत पोलीस दलाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

पोलीस दलाचे दैनंदिन कार्य अत्यंत आव्हानात्मक असून अशा क्रीडा स्पर्धांमुळे फिटनेस, कौशल्य आणि संघभावना वृद्धिंगत होते. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये महाराष्ट्र पोलीस दल सातत्याने उज्ज्वल कामगिरी करत आहे. अत्यंत उष्ण वातावरणातही स्पर्धांचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल मुंबई पोलीस व आयोजकांचे मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी कौतुक केले. खेळामध्ये जिंकणे-हरणे यापेक्षा खेळाडूवृत्ती अधिक महत्त्वाची असल्याचे सांगत सर्व सहभागी खेळाडूंना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धांमध्ये यजमान मुंबई संघाने पुरुष व महिला गटात उत्कृष्ट संघाचा किताब पटकावला. उपविजेत्या संघासह वैयक्तिक व सांघिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सर्व खेळाडूंचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मृतिचिन्ह देऊन अभिनंदन केले. १०० मीटर महिला स्पर्धेत पुणे शहरच्या निकिता संदीप खताळ आणि १०० मीटर पुरुष स्पर्धेत कोल्हापूर परिक्षेत्राच्या चैतन्य संतोष मरडे यांनी नवे विक्रम प्रस्थापित केल्याबद्दल विशेष कौतुक केले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस व मान्यवरांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना पारितोषिके प्रदान करण्यात आली. प्रास्ताविक अपर मुख्य पोलीस महासंचालक मधुकर पांडे यांनी केले. पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी मनोगत व्यक्त केले. मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राज्यातील विविध पोलीस परिक्षेत्रातील खेळाडूंनी दिमाखदार संचलन सादर केले.

यास पोलीस बँडची सुरेल संगीत साथ होती.

---

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाशी जीवनज्योत हॉस्पिटल संलग्न, सेवाभावी डॉ.किरण सवासे यांचा पाटोद्यात गौरव

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :-** पाटोदा तालुक्यातील शहरी तसेच ग्रामीण भागातील रुग्णांसाठी जिवनवाहिनी ठरलेले डॉ.किरण सवासे यांचे जीवनज्योत हॉस्पिटल आता मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाशी संलग्न झाले आहे. या निर्णयामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा मानणारे डॉ.किरण सवासे हे नेहमीच सर्वसामान्यांच्या मदतीसाठी तत्पर असतात. अत्यंत मनमिळाऊ स्वभाव,



तात्काळ उपचार देण्याची वृत्ती आणि गरजूंना आधार देण्याची भूमिका या मुळे त्यांनी अल्पावधीतच विश्वासार्ह डॉक्टर म्हणून ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत जीवनज्योत हॉस्पिटलची मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाशी झालेली संलग्नता ही त्यांच्या सेवाभावी कार्याला मिळालेली मोठी पावती मानली जात आहे. या निमित्ताने दिनांक २६ एप्रिल रविवार रोजी डॉ.किरण सवासे हे पाटोदा शहरातील डॉ.रविंद्र राजपुरे यांच्या हॉस्पिटलमध्ये आले असता डॉ.किरण सवासे यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी कॉ.महादेव नागरगोजे, डॉ.राजेंद्र राजपुरे, पत्रकार हमिदखान पठाण, पत्रकार जावेद शेख, सुनिल(नाना)दिक्षित, शाम नागरगोजे सह आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ.किरण सवासे यांच्या या कार्यामुळे आगामी काळात अधिकाधिक गरजू रुग्णांना उपचाराची संधी मिळणार असून, त्यांची सेवा अशीच अखंड सुरू राहो, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

## आसमान फाउंडेशन तर्फे गरजू विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसीय मार्गदर्शक शिबिराचे आयोजन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** सामाजिक कार्यात अग्रेसर सामाजिक संस्था आसमान फाउंडेशनच्या वतीने वर्धा येथे गरजू निराधार, गरीब, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना शैक्षणिक मार्गदर्शनासाठी तीन दिवसीय शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरांचे आयोजन आसमान फाउंडेशन वर्धा शाखा व आशा लर्निंग सेंटरच्या वतीने सेवाग्राम येथे केले गेले. शिबिरातील मुलांसाठी अनेक शैक्षणिक व मार्गदर्शनपर उपक्रम घेण्यात आले. फाउंडेशन तर्फे शिबिरातील विद्यार्थ्यांसाठी तीन ही दिवसांची नाश्ता व्यवस्था केली गेली. शिबिरांच्या यशस्वीतेसाठी फाउंडेशनचे वर्धा शाखा प्रमुख श्याम चंद्रा, रामकृष्ण धकाते, दिलीप मसने,



सचिन, अमर व आशा लर्निंग सेंटरच्या प्रमुख नूतन माळवी यांनी अथक परिश्रम घेतले. आसमान फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. रवि गिऱ्हे, सचिव नरेश शेंडे, सहसचिव विभा विंचुरकर, दिनेश टेकाडे, मेघा गिऱ्हे, डॉ. साधना थोते, प्रमोद हेडाऊ, भास्कर मुलताईकर यांनी परिक्षम घेतले व यशस्वीरित्या पार पडले. असे डॉ. रवि गि-हे यांनी कळविले.

---




**पाटोदा : भारतीय जनता पार्टी बीड जिल्हा कार्यालयात दबंग माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे (ताईसाहेब) यांची छत्रपती संभाजीनगर (प.) भारतीय जनता पार्टी जिल्हा प्रभारी म्हणून नियुक्ती झाल्या बद्दल सत्कार करुन शुभेच्छा देताना. भारतीय जनता पार्टी बीड जिल्हा सचिव सुशिल कोठेकर (छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)**

## डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत सौ.प्राची जाधव यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत दिनांक 27 एप्रिल 2026 रोजी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रायगड जिल्हा परिषद (अलिबाग) येथे समाज कल्याण व अर्थ समिती सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल सौ.प्राची अमित जाधव यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. श्रेया जाधव यांनी शाल प्रदान करून सौ.प्राची जाधव यांचा सत्कार केला. तसेच शाळेचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. एन. एम. जाधव यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव केला. संस्थेचे सचिव श्री. सुरेश जाधव यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी विशेष शिक्षिका सौ. मंजिरी बागकर यांनी शाळेच्या वाटचालीचा आढावा उपस्थितांना दिला. सत्काराला उत्तर देताना सौ.प्राची जाधव यांनी बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी आपण निश्चित सहकार्य करू, अशी ग्वाही दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. एन. एम. जाधव यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानून सौ.प्राची जाधव यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. पनवेल परिसरातील विशेष शाळेच्या कार्याची व्यापक ओळख व्हावी, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आगामी शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आमंत्रणही त्यांनी प्राची जाधव यांना दिले.

---

## मालेगावत थरारत खुन अकोला फाटा पोस्ट ऑफिस जवळल घटना

**दैनिक युवक अधार**

**मालेगाव तालुका प्रतिनिधी प्रकाश भुरे :** मालेगाव येथील अकोला फाटा पोस्ट ऑफिससमोर आज सकाळी घडलेल्या धक्कादायक घटनेने परिसर हादरला आहे कौटुंबिक वादातून एका महिलेची धारदार चाकूने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली असून,या प्रकरणातील आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे मृतक सौ.पुष्पा विठ्ठल वाघ (वय 34 वर्षे,रा. पांगरी नवघरे,ता.मालेगाव,जि. वाशिम) यांचा त्यांच्या पतीनेच



खून केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे आरोपी विठ्ठल परसराम वाय (रा.पांगरी नवघरे) हा पती असून,दोघांमध्ये नेहमीच कौटुंबिक कारणांवरून वाद होत असल्याची माहिती मिळाली आहे ही घटना आज (दि. 27 एप्रिल) सकाळी 08.00 ते 08.30 वाजण्याच्या दरम्यान अकोला फाटा पोस्ट ऑफिससमोर घडली.आरोपीने धारदार शस्त्राने पत्नीवर वार करून तिला ठार मारल्याचे फिर्यादीच्या तक्रारीवरून स्पष्ट झाले आहे.या प्रकरणी गुन्हा क्र.318/2026 अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम 103(1) (पूर्वीचे कलम 302 भा.दं.वि.) नुसार मालेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे फिर्यादी ओम नारायण राऊत (वय 27 वर्षे,रा.बेलगाव ,ता.मेहकर,जि.बुलढाणा) यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवण्यात आला घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला पोलीस निरीक्षक राजेश क्रांती खेरडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून,आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे दरम्यान,पोलीस स्टेशनपासून अवघ्या 3 किमी अंतरावर भरदिवसा ही घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे अशा प्रकारच्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असून, नागरिकांनी कठोर कारवाईची मागणी केली आहे कौटुंबिक वादातून खून भरदिवसा घटना आरोपी पोलिसांच्या ताब्यात पुढील तपास सुरू आरोपीवर कडक कारवाई होणार का? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे

---

## पनवेल महानगरपालिकेत तक्रार प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह तक्रारदाराला त्याच अधिकाऱ्याकडून उत्तर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** प्रभाग समिती 'ड' अंतर्गत अनधिकृत बांधकाम संदर्भात माहितीचा अधिकार (RTI) अर्ज व त्यानंतर तक्रार दाखल केल्यानंतरही, संबंधित प्रकरणात गंभीर विसंगती समोर आली आहे. तक्रारदाराने ज्या अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार नोंदवली आहे, त्याच अधिकाऱ्याकडून — रोशन माळी — वारंवार प्रत्युत्तर दिले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

तक्रारदार दीपक कोळवणकर यांनी संताप व्यक्त करताना म्हटले की, "ज्या अधिकाऱ्यावर कारवाई अपेक्षित आहे, त्यालाच स्वतःविरुद्धच्या तक्रारीवर उत्तर देण्याची संधी देणे म्हणजे संपूर्ण तक्रार प्रक्रियेची थट्टा आहे. ही बाब प्रशासनाच्या पारदर्शकतेवर आणि निष्पक्षतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे."

या प्रकारामुळे नागरिकांच्या तक्रारींचे निष्पक्ष निवारण होण्याबाबत शंका निर्माण होत असून, प्रशासन जबाबदारी झटकत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

**तक्रारदाराने पुढील मागण्या केल्या आहेत:**

सदर प्रकरणाची चौकशी स्वतंत्र व वरिष्ठ अधिकाऱ्याकडून करण्यात यावी

संबंधित अधिकारी रोशन माळी यांना चौकशी प्रक्रियेपासून दूर ठेवण्यात यावे

संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता राखून लेखी स्वरूपात माहिती देण्यात यावी

याबाबत योग्य व निष्पक्ष कारवाई न झाल्यास पुढील कायदेशीर पावले उचलण्याचा इशारा तक्रारदाराने दिला आहे.

# ठेवींचा विश्वास तुटला?” लक्ष्मी ग्रामीण पतसंस्थेवर २५ कोटींचा घोटाळ्याचा आरोप

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे लाखनी** - भंडारा जिल्ह्यातील आर्थिक विश्वाला हादरा देणारी बातमी समोर आली आहे. लक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था लाखनी ही सामान्य नागरिकांच्या विश्वासाची पेटी मानली जात होती. पण आता त्याच पेटीतून कोट्यवधींची रक्कम गायब झाल्याचा आरोप गुंतवणूकदारांनी केला आहे.

“स्वप्नांना व्याज, की पैशांना विराम?” गुंतवणूकदारांनी सांगितले की, आकर्षक योजना आणि दुप्पट परताव्याच्या आमिषाने हजारो लोकांनी आपल्या कष्टाच्या कमाईची गुंतवणूक केली. पण मुदत संपूनही पैसे परत न मिळाल्याने आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.“पैसे कुठे गेले?” हा सवाल सर्वसामान्यांच्या मनात घुमतो आहे.

अचानक अनेक शाखा बंद झाल्यामुळे नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण आहे.साकोली, लाखनी, पिंपळगाव, मुरमाडी अशा अनेक ठिकाणी कार्यरत शाखांमधून व्यवहार ठप्प झाले आहेत. गुंतवणूकदार म्हणतात “आम्ही विश्वास ठेवला... पण आता आमचाच विश्वासघात झाला!”

पीडित गुंतवणूकदारांनी एकत्र येत जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले आहे.संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावे तसेच त्यांची संपत्ती जप्त करून गुंतवणूकदारांना पैसे परत करावे अशी मागणी करण्यात येत आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मात्र हे आरोप फेटाळले आहेत.त्यांचे म्हणणे आहे की, काही कर्जे थकीत असल्यामुळे अडचण निर्माण झालीवसुली सुरू असून टप्प्याटप्प्याने पैसे परत केले जात आहेत.फसवणूक झालेली नाही. आता खरी गोष्ट काय आहे?एकीकडे गुंतवणूकदारांचा आक्रोश, तर दुसरीकडे संस्थेचे स्पष्टीकरण...यामध्ये सत्य नेमके कुठे आहे, याचा उलगडा चौकशीनंतरच होणार आहे. “सामान्य माणसाचा पैसा सुरक्षित आहे का?”हा प्रश्न फक्त लाखनी पुरता मर्यादित नाही... तर संपूर्ण सहकार क्षेत्रासाठी इशारा आहे.ही फक्त बातमी नाही... तर विश्वास, आशा आणि कष्टाच्या पैशांची कहाणी आहे.

# पुराड्यात ९१ जोडप्यांचा 'शाही' विवाह सोहळा संपन्न; आदिवासी संस्कृतीचा घुमला महामंत्र!

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : देवरी/पुराडा अवाढव्य खर्चाला फाटा देऊन समाजाला आर्थिक स्थैर्य देण्याच्या उद्देशाने, आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय पुराम व सौ. सविता पुराम यांच्या नेतृत्वाखाली पुराडा येथे आयोजित भव्य आदिवासी सामाजिक सामूहिक विवाह सोहळा आज मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात ९१ जोडप्यांनी पारंपारिक आदिवासी रीतीरिवाजांनुसार विवाहबंधनात अडकून नवीन आयुष्याची सुरुवात केली.




**दिग्गजांची उपस्थिती**

या सोहळ्याला राज्याचे गृहराज्यमंत्री ना. पंकज भोयर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मंचावर राज्यसभा खासदार मायाताई इनवाते, गडचिरोली-चिमूरचे खासदार डॉ. नामदेव किरसान, जिल्हा परिषद अध्यक्ष लेखराम भेंडारकर, भाजप संघटन मंत्री वीरेंद्र अंजनकर, उपाध्यक्ष सुरेश हर्षे, देवरी पंचायत समिती सभापती अनिल बिसेन यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**अनुदान वाढवण्याची आग्रही मागणी**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना माजी महिला व बालकल्याण सभापती सौ. सविता पुराम यांनी आदिवासी बांधवांच्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. "सध्या मिळणारे २५ हजार रुपयांचे कन्यादान अनुदान महागाईच्या काळात अपुरे आहे, ते ५० हजार रुपये करण्यात यावे. तसेच, मध्यप्रदेश व छत्तीसगडशी आपले रोटी-बेटीचे नाते असल्याने, या राज्यांतील विवाहांनाही योजनेचा लाभ मिळावा," अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

**मंत्र्यांचे सकारात्मक आश्वासन**

सविता पुराम यांच्या मागणीला प्रतिसाद देताना गृहराज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की, "आदिवासी समाजाच्या या मागण्या अत्यंत रास्त आहेत. कन्यादान योजनेची राशी वाढवण्यासाठी मी स्वतः मंत्रिमंडळात आणि सभागृहात ताकदीने पाठपुरावा करेन. राज्य सरकार आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे."

**मांदरीच्या तालावर सांस्कृतिक जागर**

विवाहाच्या पूर्वसंध्येला (२५ एप्रिल) पारंपारिक मांदरी नृत्याचा जल्लोष पाहायला मिळाला. यामध्ये खासदार मायाताई इनवाते, आमदार संजय पुराम, सविता पुराम आणि मान्यवरांनी हातात मांदरी घेऊन वधू-वर व गावकऱ्यांसह ठेका धरला. ढोल-ताशांच्या गजरात रात्रभर आदिवासी संस्कृतीचा जागर सुरू होता.

**संस्कृती जतन व समाजहित**

"समाजाला कर्जाच्या विळख्यातून वाचवणे आणि आपली मूळ संस्कृती टिकवून ठेवणे हाच या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे," असे मत आमदार संजय पुराम यांनी व्यक्त केले. २०१४ पासून सातत्याने राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. आज दुपारी ११ वाजता संपन्न झालेल्या या सोहळ्याला हजारो नागरिकांची उपस्थिती लाभली होती.

# मालेगावात ‘गो सन्मान आव्हान अभियान’चा प्रचंड प्रतिसाद – शिव चौक ते तहसील कार्यालय भव्य रॅली

**दैनिक युवक अधार**
**मालेगाव तालुका प्रतिनिधी /प्रकाश भुरे** : आज मालेगाव येथे ‘गो सन्मान आव्हान अभियान’ अंतर्गत भव्य जन रॅली पार पडली. शिव चौक येथील श्री राम मंदिरापासून ते तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या भव्य रॅली मध्ये महिला, पुरुष तसेच युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सहभागी नागरिकांच्या हातामध्ये विविध गो सम्मान आव्हान अभियान फलक व बॅनर होते, ज्यावर गोसंरक्षण, गोसंवर्धन आणि गोवंशाच्या सन्मानासाठी ठोस




कायदा करण्याच्या मागण्या स्पष्टपणे मांडण्यात आल्या.

गो सम्मान रॅली दरम्यान “गोमाता संरक्षण करा”, “गोहत्या बंदी लागू करा” शिस्तबद्ध पद्धतीने काढण्यात आलेल्या या गो सम्मान रॅली मुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.तहसील कार्यालयात पोहोचल्यानंतर प्रतिनिधी मंडळाने तहसीलदार साहेबांना निवेदन सादर केले. या निवेदनामध्ये केंद्र सरकारने गोसंरक्षणासाठी कठोर आणि एकसंध कायदा लागू करावा, तसेच भारतीय संविधानातील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात मालेगावातील सर्व गोसेवक प्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, संतवर्ग व विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम शांततेत आणि संघटित पद्धतीने पार पडला असून या रॅली मुळे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात यश आल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली.

मालेगावातील या भव्य प्रतिसादामुळे ‘गो सन्मान आव्हान अभियान’ला आणखी बळ मिळाले असून भविष्यातही अशा प्रकारच्या जनजागृती उपक्रमांना वेग मिळणार असल्याचे चित्र दिसत आहे.

# पोलीस ठाणे हुडकेश्वर, नागपूर येथे भ्रष्टाचाराचा धक्कादायक मामला!

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** पोलीस ठाणे हुडकेश्वर येथील तीन पोलीसकर्मींनी एका आम आदमीला फसवून ₹4,50,000/- रुपये घेतल्याचा धक्कादायक मामला समोर आला आहे. आरोपी पोलीसकर्मींमध्ये बजरंग जुनघरे, सतीश मानके, आणि एपीआय रामटेके यांचा समावेश आहे.

श्री. अमित उमेश ठाकरे, निवासी पिपळा फाटा, नागपूर यांनी आरोप केला आहे की, त्यांना 30 मार्च 2026 रोजी पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे बोलावून घेतले गेले आणि त्यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन ₹5,00,000/- रुपये मागितले गेले. घाबरलेल्या ठाकरेंनी ₹4,50,000/- रुपये रोख दिले आणि उर्वरित ₹50,000/- रुपये दुसऱ्या दिवशी देण्याचे आश्वासन दिले.

पोलीसकर्मींनी ठाकरेंना धमकी दिली की, जर पैसे दिले नाहीत तर त्यांना गुन्ह्यात फसवले जाईल. ठाकरेंनी पैसे दिल्यानंतरही, पोलीसकर्मींनी त्यांच्यावर खोटा गुन्हा दाखल केला आणि पैसे उकळण्याचा प्रयत्न केला.


या प्रकरणात, आम आदमीच्या अधिकारांच्या रक्षणासाठी आणि भ्रष्टाचार विरुद्ध लघु करणारी कारवाई करण्यासाठी, आम्ही नागपूर पुलिस आयुक्त आणि उच्चाधिकाऱ्यांना अपील करतो की, आरोपी पोलीसकर्मींवर कडक कारवाई करण्यात यावी.

**बातमीची मुख्य मुद्दे:**

- पोलीस ठाणे हुडकेश्वर येथील तीन पोलीसकर्मींनी आम आदमीला फसवून ₹4,50,000/- रुपये घेतले.
- आरोपी पोलीसकर्मींमध्ये बजरंग जुनघरे, सतीश मानके, आणि एपीआय रामटेके यांचा समावेश आहे.
- आम आदमीने आरोप केला आहे की, पोलीसकर्मींनी त्यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली.
- पोलीस आयुक्त आणि उच्चाधिकाऱ्यांना अपील करण्यात आले आहे की, आरोपी पोलीसकर्मींवर कडक कारवाई करण्यात यावी.

# श्री छत्रपती कारखान्याची पुढील महिन्यात विशेष सभा :- अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांची माहिती

**दैनिक युवक आधार**
**सणसर / विकास क्षत्रिय** : भवानीनगर येथे रविवारी दि.26 एप्रिल रोजी झालेल्या उदघाटनाच्या कार्यक्रमात श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांनी कारखान्याच्या व्यावसायिक गाळ्यांची भाडेवाढ १५ वर्षांनी करण्यात आली असल्याचे सांगितले.या निर्णयाचा फायदा थेट सभासदांना होणार असून,गाळेधारकांनी ११ महिन्यांचा करार केल्यानंतर पुढील १०० वर्षांपर्यंत वार्षिक व्यवसाय करण्याची हमी दिली आहे. कोणालाही गाळ्यातून बाहेर काढले जाणार नाही,असेही त्यांनी स्पष्ट केले



कारखण्याची मालमत्ता ही ३२ हजार सभासदांची आहे. गाळ्यांसाठी त्यावेळच्या संचालक मंडळाने २० नियम केलेले असून,त्यावरून कोणताही कायदेशीर वाद होणार नाही,याची खात्री करूनच भाडेवाढ करण्यात आली आहे.

सभासदांचा ऊस लवकर गेला पाहिजे,गहू झाला पाहिजे,ऊसाला भाव मिळाला पाहिजे,या सर्व बाबींचा विचार करून पुढील महिन्यात विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात येणार आहे. १० ते १२ लाख टन गाळप झाले तरच कारखाना चालेल, असे जाचक यांनी सांगितले.दौंड शुगर व माळेगावपेक्षा छत्रपती कारखान्याच्या कामगारांचा पगार जास्त असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून कारखान्यासाठी २९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला गेला आहे.भाडेवाढीनंतर टक्केवारीनुसार गाळेधारकांनी कारखान्याकडे भाडे जमा केले आहे.

# निडी गावकरांच्या आरोग्यावर JSW स्टीलचा कचरा धोका; ग्रामपंचायतीची कंपनीला चेतावणी

## भटक्या कुत्र्यांचा रेबीज धोका; JSW साळाव कचऱ्यामुळे निडी गाव त्रस्त!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे /अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील निडी गावाजवळील JSW स्टील कंपनीच्या वसाहतीतून निघणाऱ्या कचऱ्यामुळे ग्रामस्थांना आरोग्यसंकटाचा सामना करावा लागत आहे. ग्रामस्थ प्रकाश चंद्रकांत तांबडे यांनी ग्रुप ग्रामपंचायत साळाव यांच्याकडे लेखी तक्रार नोंदवली असून, कंपनीने निडी रस्त्याच्या बाजूला उघड्यावर कचरा टाकल्याने दुर्गंध, प्रदूषण आणि श्वसनाचे आजार होत असल्याचे सांगितले आहे.

**तक्रारीचे मुख्य मुद्दे**

कंपनी वसाहतीतील कचरा रस्त्यावर उघडे पडल्याने ग्रामस्थ, शाळकरी मुले



आणि ज्येष्ठ नागरिकांना दुर्गंध आणि धुराचा त्रास होतो, ज्यामुळे आरोग्याला धोका निर्माण होतो.

कचरा जाळल्याने श्वसनाचे आजार वाढतात; भटकी कुत्रे, बकऱ्या, गाई-गुरे हा कचरा खाऊन विषबाधा होऊ शकते, रेबीजचं प्रमाण वाढल्याने चावण्याचा धोका.

ग्रामस्थ तांबडे यांनी सांगितलं, "कुत्र्याने चावलं तर जबाबदारी कोणाची? विषबाधा झाली तर कंपनी दायी?"

**ग्रामपंचायतीची कारवाई**

ग्रुप ग्रामपंचायत साळावचे सरपंच वैभव कांबली आणि ग्रामविकास अधिकारी बिरवाडकर यांनी JSW स्टील लि., साळाव येथील व्यवस्थापक (CSR विभाग) यांना लेखी पत्र दिले आहे. पत्रात कचऱ्याचं त्वरित व्यवस्थापन, डंपिंग ग्राउंडमध्ये विल्हेवाट आणि कंपाउंड उभारण्याची मागणी केली असून, कार्यवाही न झाल्यास पुढील कायदेशीर कारवाईची चेतावणी देण्यात आली आहे.

**पार्श्वभूमी आणि कंपनीची भूमिका**

JSW स्टील साळाव येथे स्पॉंज आयर्न आणि ग्रीन स्टील प्रकल्प चालवते, ज्यात वेस्ट मॅनेजमेंटवर भर असल्याचा दावा केला जातो. मात्र, निडी-चेहेर-मिठेखार परिसरात पूर्वीही शेतकऱ्यांच्या जमिनी आणि पर्यावरणीय तक्रारी होत्या. कंपनीने CSR अंतर्गत वेस्ट मॅनेजमेंट उपक्रम राबवले असले तरी स्थानिक तक्रारींना प्रतिसाद देताना कारवाईची गरज आहे.

# दिग्रसमध्ये भर उन्हाळ्यात विजेचा लपंडाव' नागरिक हैराण, महावितरणावर संताप

**दैनिक युवक आधार**
**दिग्रस प्रतिनिधी उमेश साखरकर** : भर उन्हाळ्यात तापमानाचा पारा चढत असताना शहरात विजेच्या सतत खंडित पुरवठ्यामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. विशेष म्हणजे ना वादळी वारे, ना पावसाचे कारण- तरीही दिवसभरात वारंवार वीज जाण्याच्या प्रकारांनी नागरिकांचा संताप वाढला आहे. 'ना हवा, ना पाणी, तरीही लाईट जाते,' अशी प्रतिक्रिया स्थानिक रहिवाशांकडून व्यक्त होत आहे. शहरातील विविध भागांत दिवसातून अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने घरगुती कामे, व्यावसायिक व्यवहार तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर मोठा परिणाम होत आहे.

उकाड्यामुळे आधीच त्रस्त असलेल्या नागरिकांना विजेच्या लपंडावामुळे आणखी त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांसाठी ही परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वीजपुरवठा खंडित होण्याबाबत कोणतीही पूर्वसूचना दिली जात नाही. दररोज ठराविक वेळेशिवाय कधीही लाईट जाते, त्यामुळे कामांचे नियोजन करणे अशक्य झाले आहे, असे नागरिकांमधून ऐकण्यास मिळत आहे. दुकाने, कार्यालये आणि लघुउद्योगांमध्ये कामकाज ठप्प होत असून आर्थिक नुकसान होत आहे. विशेषतः ऑनलाइन व्यवहार, बँकिंग सेवा आणि लहान उद्योगांवर त्याचा परिणाम दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी महावितरणकडे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वारंवार होणाऱ्या विजेच्या खंडित पुरवठ्यामागे नेमके कारण काय? तांत्रिक बिघाड, ओव्हरलोड की अपुरे नियोजन, याबाबत स्पष्ट माहिती देण्याची मागणी होत आहे. महावितरणकडून काही भागांत दुरुस्तीचे काम, लाईनवरील तांत्रिक अडचणी किंवा वाढलेल्या मागणीमुळे ताण येत असल्याचे सांगितले जात आहे. तथापि नागरिकांना याबाबत ठोस आणि वेळेवर माहिती न मिळाल्याने संताप अधिकच वाढत आहे.

शहरात वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर अखंडित वीजपुरवठा राखणे अत्यावश्यक असताना अशा प्रकारच्या अनियमिततेमुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. आता तरी महावितरणने ठोस उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

# देवणी शहरात वासवी कन्यका परमेश्वरी देवी जन्मोत्सवानिमित्त भव्य मिरवणूक उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणी वैश्य (कोमटी)समाजाच्या कुलस्वामिनी वासवी कन्यका परमेश्वरी देवी यांच्या जन्मोत्सवानिमित्त दि. 26 एप्रिल 2026 रोजी देवणी शहरातील राम मंदिरापासून सायंकाळी सहा वाजता भव्य मिरवणूक मोठ्या उत्साहात काढण्यात आली. या मिरवणुकीत देवीची सुंदर व आकर्षक प्रतिमा सजवून ठेवण्यात आली होती. देवणी शहरातील व तालुक्यातील ग्रामीण भागातून वैश्य समाजातील पुरुष व महिला यांच्यासह इतर समाजातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.ढोल-ताशा, बँड-बाजा आणि फटाक्यांच्या आतषबाजीत मिरवणूक रंगतदार झाली होती. विशेषतः वैश्य (कोमटी) समाजातील महिलांनी दांडिया खेळ सादर करून कार्यक्रमाला वेगळीच शोभा आणली. तसेच वासवी मातांच्या भक्तीगीतांवर भक्तांनी उत्साहाने नृत्य करत देवीप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली.




वासवी कन्यका परमेश्वरी देवी या सत्य, अहिंसा आणि त्याग यांचे प्रतीक मानल्या जातात. त्यांनी समाजाच्या रक्षणासाठी अन्यायाविरुद्ध उभे राहत अहिंसेचा मार्ग स्वीकारला, त्यामुळे त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे. दुर्गा देवीप्रमाणेच वासवी मातांनीही समाजाला धैर्य, एकता आणि धर्मनिष्ठेचा संदेश दिला. त्यांच्या कार्यातून स्त्रीशक्तीचा आदर्श पुढे येतो, जो आजच्या समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.या मिरवणुकीद्वारे समाजात एकोपा, धार्मिक भावना आणि सांस्कृतिक परंपरा जपण्याचा संदेश देण्यात आला.

# महिलांची छेड काढणारा नराधम दिग्रस पोलिसांच्या जाळ्यात

## अवघ्या दोन तासांत आरोपीला बेड्या

**दैनिक युवक आधार दिग्रस तालुका प्रतिनिधीउमेश साखरकर** : दिग्रस शहरातील विविध भागांत मागील दोन महिन्यांपासून महिलांना 'बॅड टच' करून पसार होणाऱ्या एका विकृत इसमाला दिग्रस पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. मोहमद नियाजी मोहमद इब्राहिम (वय ४२ वर्ष, रा. दिवान नगर, दिग्रस) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

गेल्या काही दिवसा पासून दिग्रस शहरातील बंग लेआऊट, भास्करवार लेआऊट, व्यंकटेश नगरी आणि पाटील नगर या भागांत एक अज्ञात इसम काळ्या रंगाच्या दुचाकीवर येऊन, तोंडाला रुमाल बांधून महिलांची छेड काढत होता. आरोपी आपल्या दुचाकीच्या नंबर प्लेटवर काळ्या रंगाचा स्टिकर लावून ओळख लपवत असे. या प्रकारामुळे परिसरात महिलांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

याप्रकरणी पीडित महिलेने पोलीस स्टेशनला तक्रार दिल्यानंतर, प्रकरणाचे गांभीर्य ओळखून प्रभारी अधिकारी डॉ. श्री. तेजस सारडा यांनी तपासासाठी तीन स्वतंत्र पथके तयार केली.

पोलिसांनी यापूर्वीच आरोपीची माहिती देणाऱ्यास १०,००० रुपयांचे बक्षीस देखील जाहीर केले होते.दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीवरून पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे अवघ्या दोन तासांत आरोपी मोहमद नियाजी याला त्याच्या दुचाकीसह ताब्यात घेण्यात आले. आरोपीविरुद्ध कलम ७४, ७५(२), ७८(२), ७९ बी.एन.एस. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही धडक कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. श्री. सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रभारी अधिकारी डॉ. श्री. तेजस सारडा व त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# दर्यापूरमध्ये कॅफेच्या नावाखाली 'कपल'साठी खासगी केबिन?

## नागरिकांमध्ये संशय, प्रशासनाचे मौन

**दैनिक युवक आधार दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : दर्यापूर शहरात अलिकडे "कॅफे कल्चर" वाढत असतानाच, काही कॅफेचालकांकडून तरुण जोडप्यांसाठी बंदिस्त आणि खासगी केबिन उपलब्ध करून दिल्या जात असल्याची जोरदार चर्चा शहरात रंगली आहे. या केबिनचा नेमका वापर कशासाठी केला जातो, याबाबत नागरिकांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले असून पालक वर्गात विशेष चिंता व्यक्त केली जात आहे.



काय आहे प्रकरण

स्थानिक नागरिकांच्या मते, शहरातील काही कॅफेमध्ये मुख्य हॉलमध्ये खुले टेबल-खुर्च्या बसण्याची व्यवस्था असण्याऐवजी ग्राहकांसाठी पूर्णपणे बंदिस्त अशा छोट्या केबिन तयार करण्यात आल्या आहेत. या केबिनला दरवाजे किंवा पडदे लावलेले असून आतमध्ये कोणालाही डोकावता येत नाही. तिथे कोणतीही देखरेख किंवा सीसीटीव्ही नसल्याचे बोलले जाते. केवळ जोडप्यांनाच या केबिन दिल्या जातात, असा आरोपही काही नागरिकांनी केला आहे.

नागरिकांमध्ये नाराजी

"मुले-मुली अभ्यासाच्या नावाखाली तासन् तास या बंद केबिनमध्ये बसतात. आत काय चालते हे बाहेरून कळत नाही. यामुळे गैरप्रकारांना प्रोत्साहन मिळण्याची भीती आहे," असे एका स्थानिक पालकाने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही यानिमित्ताने ऐरणीवर आला आहे. शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी अशा कॅफेंची तातडीने तपासणी करण्याची मागणी केली आहे.

प्रशासनाचे मौन का?

या संपूर्ण प्रकरणावर नगर परिषद, अन्न व औषध प्रशासन आणि पोलिस विभागाने अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका घेतलेली नाही. संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई किंवा संयुक्त तपास सुरू झाल्याचे दिसून येत नाही. प्रशासनाच्या या मौनामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

"मोठी घटना घडल्यावरच प्रशासनाला जाग येणार का? अनुचित प्रकार घडण्यापूर्वीच कारवाई व्हायला हवी," अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

काय आहे नियम?

कॅफे किंवा रेस्टॉरंटसाठी परवाना देताना अन्न व औषध प्रशासनाकडून जागेची रचना, स्वच्छता आणि सुरक्षा याबत नियम घालून दिले जातात. सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारे पूर्ण बंदिस्त केबिन बांधणे आणि त्याचा गैरवापर होऊ देणे हे परवान्याच्या अटींचे उल्लंघन ठरू शकते. पोलिस विभागालाही सार्वजनिक ठिकाणी अश्लील वर्तन रोखण्याचे अधिकार आहेत.

नागरिकांनी शहरातील अशा सर्व कॅफेंची सखोल तपासणी करावी आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास त्यांचे परवाने रद्द करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

प्रशासन यावर काय पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# श्रीवर्धनमध्ये 'विराट हिंदू संमेलन' उत्साहात संपन्न ; अभयराजे जगताप यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : श्रीवर्धन : सकल हिंदू समाज, श्रीवर्धन यांच्या वतीने सोमवार, २७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेले 'विराट हिंदू संमेलन' मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडले. धर्म, संस्कार, संघटन आणि राष्ट्रभक्ती या चतुःसूत्रीवर आधारित या भव्य संमेलनाने शहरात एकात्मतेचा आणि सांस्कृतिक अभिमानाचा जागर निर्माण केला.

कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी श्री गणेश मंदिर ते श्री सोमजादेवी मंदिर या मार्गावर निघालेल्या भव्य दिंडीने झाली. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या नागरिकांनी जयघोष आणि टाळ मृदुंगाच्या गजरात संपूर्ण परिसर दुमदुमून सोडला. त्यानंतर मंदिराच्या पटांगणात साहसी मर्दानी खेळ आणि प्रबोधनात्मक पथनाट्यांचे सादरीकरण करण्यात आले, ज्याला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या संमेलनाचे प्रमुख आकर्षण ठरले ते प्रख्यात वक्ते अभयराजे जगताप यांचे मार्गदर्शन. आपल्या ओजस्वी आणि प्रेरणादायी भाषणातून त्यांनी हिंदू समाजातील एकता, संस्कृतीचे जतन आणि राष्ट्रभक्तीची गरज यावर प्रभावी भाष्य केले. त्यांच्या विचारांनी उपस्थितांमध्ये नवचैतन्य आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण केली.

कार्यक्रमाची सांगता श्री सोमजादेवीच्या महाआरतीने झाली. त्यानंतर प्रसाद वाटप करून सोहळ्याचा समारोप करण्यात आला. या भव्य संमेलनाला श्रीवर्धन शहरासह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला. आयोजनामागील उद्दिष्ट असलेली समाजातील एकजूट आणि सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन याची प्रभावी झलक या संमेलनातून पाहायला मिळाली.

# स्पर्धेच्या युगामध्ये टिकण्यासाठी शिक्षकांनी अथक परिश्रम घेणे काळाची गरज - सौ.अनितातार्ई सरनाईक

**दैनिक युवक आधार रिसोड(प्रतिनिधी) -रणजितसिह. ठाकूर** : येणारा काळ हा स्पर्धेचा काळ आहे, इंग्रजी शाळांच्या स्पर्धेमध्ये मराठी शाळा टिकवायच्या असतील तर मराठी शाळेतील शिक्षकांनी अथक परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्नरत राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे आयोजित सहविचार सभेच्या प्रमुख मार्गदर्शक स्थानावरून बोलत असताना श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाशिम च्या स्थानिक शाळा समिती अध्यक्षा सौ.अनितातार्ई किरणराव सरनाईक यांनी केले. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज व श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिमचे संस्थापक स्वर्गीय ॲड.आप्पासाहेब सरनाईक यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य संजय देशमुख यांनी अनितातार्ई सरनाईक यांचा यथोचित सन्मान केला. यावेळी मंचावर उपप्राचार्य संजय नरवाडे, पर्यवेक्षक गजानन भिसडे, मराठी प्राथमिक चे मुख्याध्यापक सचिन देशमुख व उर्दू प्राथमिक चे मुख्याध्यापक अनिस खान हे उपस्थित होते.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की शिक्षक हा विद्यार्थ्यांचा आदर्श असतो, त्यामुळे शिक्षकांनी वक्तशीरपणा, कामाप्रती प्रामाणिकता ठेवून, स्वतःच्या विषयावर संपूर्ण प्रभुत्व आणावे तसेच नवीन बदलांची आणि प्रवाहांची माहिती ठेवून ते ज्ञान सोप्या भाषेत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सतत प्रयत्न करावे असे सांगितले.

या सहविचार सभेचे प्रास्ताविक प्राचार्य संजय देशमुख यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून हे युग तंत्रज्ञानाचे युग असून या तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांनी विद्यार्थी हित विचारात घेऊन स्वतःला अद्ययावत करावे असे आवाहन केले. याप्रसंगी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातून विविध उपक्रमामध्ये शिक्षकांनी घेतलेल्या अथक परिश्रमाबद्दल त्यांचेही अनितातार्ई सरनाईक यांच्या हस्ते कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. विजय देशमुख यांनी केले. या सहविचार सभेस शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# ३० वर्षांनंतर पुन्हा वाजली शाळेची 'घंटा' अन् काळाच्या पडद्याआड गेलेली मैत्री पुन्हा झाली जिवंत!

**दैनिक युवक आधार तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : तेच हास्यं, तेच खिदळणं आणि एकमेकांना दिलेली तीच टोपणनावं... निमित्त होतं कोकण एज्युकेशन सोसायटीचे सेकंडरी स्कूल, चिरनेर येथील १९९५-९६ च्या बॅचच्या स्नेहसंमेळावाचं! तब्बल ३० वर्षांनंतर जेव्हा हे मित्र-मैत्रिणी एकमेकांसमोर आले, तेव्हा काळाची ३० वर्षे जणू एका क्षणात विरून गेली. २६ एप्रिल रोजी निसर्गाच्या कुशीत भरलेल्या या 'मैत्रीच्या शाळेत' पुन्हा एकदा भावनांचा पूर लोटला.

या सोहळ्यासाठी मोठी जुई, चिरनेर, मोठे भोम, कळंबूसरे, कोप्रोली, उरण, पनवेल, खोपोली




आणि नवी मुंबई अशा विविध भागांत विखुरलेले सर्व मित्र-मैत्रिणी आपली सर्व कामे आणि जबाबदाऱ्या बाजूला सारून एकत्र जमले होते. कार्यक्रमाची सुरुवात अतिशय जड अंतःकरणाने झाली. ज्या मित्रांनी अर्ध्यावरच साथ सोडली, त्या दिवंगत जीवाभावाच्या सोबत्यांना श्रद्धांजली वाहताना प्रत्येकाचे डोळे ओलावले होते.मोठी जुई येथील वाडा बस स्टॉपसमोरील डोंगराच्या पायथ्याशी, निसर्गरम्य वनराईत हा मेळावा रंगला. चुलीवरचा धूर, त्यावरील खमंग शाकाहारी-मांसाहारी जेवण आणि एकमेकांना दिलेले मदतीचे हात पाहून जुन्या शालेय सहलींच्या आठवणी ताज्या झाल्या. मनोगत व्यक्त करताना एका मित्राने म्हटले, "पूर्वी खिशात पैसा नव्हता पण मनमोकळं जगण्यासाठी भरभरून वेळ होता, आज पैसा आहे पण निवांत जगण्यासाठी वेळ उरला नाही..." या वाक्याने उपस्थित सर्वांच्या काळजाचा ठोका चुकला. दिवस मावळतीला आला तशी पाखरं आपापल्या घरट्याकडे जाण्यास निघाली. पण निरोप घेताना पाय जणू जमिनीला खिळले होते. एकमेकांचा हात हातात घेऊन, "आता केवळ संपर्कात राहणी पुरेसे नाही तर सर्वांनी एकमेकांच्या संकटातही खंबीरपणे धावून यायचे आणि भविष्यात एकमेकांच्या सुखदुःखात कायम सहभागी व्हायचे असे वचन देताना प्रत्येकाचा कंठ दाटून आला होता तीस वर्षांनंतर ती ही भेट केवळ एक गेट-टुगेदर नव्हतं तर विखुरलेल्या काळजाच्या तुकड्यांना पुन्हा जोडणारा एक मायेचा ओलावा होता निरोप घेताना शब्द ओठांवर थांबले होते पण ओलावलेल्या डोळ्यांनी बरंच काही सांगून टाकलं होतं.

"नाती रक्ताची नसली ,तरी ती रक्तापलीकडे धावतात..मैत्रीची ही पावलं आयुष्याचा थकवा घालवतात.... "

## जाहीर नोटिस

**नमुना एन डी**
**(नियम ९२(३) पहा)**

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46AZ7893 चे मालक कै.बाळाराम बबन कडू याचं दिनांक 07/05/2021 रोजी निधन झाले आहे.

**मी**
**अपर्णा बाळाराम कडू**
**विलेज -चिंद्रण, पो - देवीचापाडा, ता - पनवेल, महाराष्ट्र, रायगड - 410206**

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**अपर्णा बाळाराम कडू**
**विलेज - चिंद्रण, पो - देवीचा पाडा ता - पनवेल,**
**महाराष्ट्र, रायगड - 410206.**

# गो सन्मान आव्हान अभियान



**दैनिक युवक आधार भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा म्हणून आज २७ एप्रिल २०२६ रोजी तालुका गो सन्मान आव्हान समिती लाखनीच्या वतीने तहसीलदार लाखनी तर्फे निवेदन पंतप्रधान नरेंद्र दामोदरदास मोदी, महामहिम राज्यपाल महाराष्ट्र राज्य मुंबई, महामहोम राष्ट्रपती दिल्ली,मुख्यमंत्री महाराष्ट्र सरकार मुंबई यांना देण्यात आले. तत्पूर्वी श्रीराम मंदिर समर्थ नगर येथे प्रभू श्रीरामचंद्र व राम दरबार यांचे पूजन करून गोमाता आणि गाईचे वासरू यांचेही पूजन ह.भ.प. चवळे महाराज यांच्या हातून करण्यात आले. श्रीराम जय राम जय जय राम चा ,गो माता की जयआदी जयघोष करण्यात आला . श्रीराम मंदिर येथे संकल्प घेण्यात आला की गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळालाच पाहिजे.

# "पुरोगामी महाराष्ट्रात भोंदूगिरीचा विळखा : श्रद्धा की अंधश्रद्धा?"

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर** : पुरोगामी विचारांची परंपरा जपणाऱ्या महाराष्ट्राची ओळख ही विवेक, विज्ञाननिष्ठा आणि सामाजिक जागृती यांवर उभी आहे. महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महापुरुषांनी अंधश्रद्धेविरुद्ध लढा देत समाजाला विचारांचे स्वातंत्र्य दिले. तरीही अलीकडील काही गाजलेल्या प्रकरणांनी एक कटू वास्तव समोर आणले आहे—भोंदूगिरीचे जाळे अजूनही समाजाच्या मनोभूमिकेत खोलवर रुजलेले आहे. भीती, असुरक्षितता आणि "क्षणात उपाय" मिळवण्याची मानसिकता यामुळे सामान्य माणूसच नव्हे, तर सुशिक्षित, सधन आणि प्रभावशाली लोकही अशा भोंदूंच्या जाळ्यात अडकताना दिसतात. त्यामुळे प्रश्न उभा राहतो—जे स्वतः समाजाला दिशा देतात, तेच जर या अंधश्रद्धेला बळी पडत असतील, तर सर्वसामान्य जनतेने कोणता आदर्श घ्यायचा?

या भोंदूगिरीचा सर्वात विदारक चेहरा म्हणजे श्रद्धेच्या नावाखाली होणारे शोषण. "दैवी शक्ती", "गुप्त साधना" किंवा "समस्या निवारण" अशा गोंडस शब्दांच्या आडून अनेक भोंदू लोक आर्थिक लूट तर करतातच, पण काही वेळा महिलांवर मानसिक, शारीरिक आणि लैंगिक अत्याचारही घडवतात. विशेषतः अडचणीत सापडलेल्या महिलांना "उपचार" किंवा "उपाय" सांगण्याच्या नावाखाली एकांतात बोलावून त्यांचा गैरफायदा घेतला जातो. धक्कादायक बाब म्हणजे, काही वेळा समाजातील प्रतिष्ठित किंवा राजकीय व्यक्ती देखील अशा भोंदूंकडे जाताना दिसतात. अशा घटनांमुळे समाजात चुकीचा संदेश जातो—"जर मोठी माणसेच असे करत असतील, तर यात चुकीचे काय?"—आणि याच मानसिकतेतून सर्वसामान्य माणूस अधिक सहजपणे या सापळ्यात अडकतो.

> **आज गरज आहे ती केवळ भोंदूगिरीविरोधात आवाज उठवण्याची नाही, तर विवेकाचा दीप प्रत्येकाच्या मनात प्रज्वलित करण्याची. जेव्हा समाज स्वतः जागा होईल, तेव्हाच पुरोगामी महाराष्ट्राची खरी ओळख पुन्हा एकदा तेजस्वीपणे उजळून निघेल.**
>
> **दिवाकर मोहोड**
> **नागपूर**

राज्यात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अस्तित्वात असला, तरी केवळ कायदे पुरेसे ठरत नाहीत, हे वारंवार दिसून येते. अज्ञान, भीती, सामाजिक दबाव आणि तक्रार करण्याची भीती यामुळे अनेक प्रकरणे उघडकीसच येत नाहीत. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर केवळ प्रशासनात नाही, तर समाजाच्या सामूहिक जागृतीत दडलेले आहे. शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचार आणि प्रश्न विचारण्याची सवय रुजवली गेली पाहिजे. धर्म आणि अध्यात्म यांचा खरा अर्थ समजून घेतला, तर भोंदूगिरीला आपोआप आळा बसेल. कारण धर्म हा माणसाला उन्नत करणारा असतो, तर अंधश्रद्धा त्याला अधोगतीकडे नेणारी असते.

# नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे सन्मा. न्यायमुर्ती श्री.अनिल एस.किलोर साहेब, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर व सन्मा.न्यायमुर्ती श्रीमती उर्मिला जोशी फळके उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचे हस्ते विविध हस्तकला कौशल्य प्रशिक्षण व गांधी विचारधारा निबंध स्पर्धा प्रमाणत्राचे वितरण

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** "सुधारणा पुनर्वसन" हे महाराष्ट्र कारागृहाचे ब्रिद वाक्य असुन कारागृहातील बंदयांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी कारागृहात विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. याचाच एक भाग म्हणून नागपूर मध्यवर्ती कारागृहामधील महिला व पुरुष बंदयांना तसेच महीला कारागृह अधिकारी/कर्मचारी व पुरुष अधिकारी/ कर्मचारी यांच्या महिला कुटुंबियासांठी क्ले ज्वेलरी, वारली पेंटीग, ले पेपर वेट, फॅब्रिक पाऊच, टोट बॅग, लिपन आर्ट आणि कोस्टर हस्तकला अशा विविध हस्तकला वस्तु बनविण्याचे प्रशिक्षण पिडीलाईट फेविक्रील इंडीया,नागपूर यांचे सौजन्याने देण्यात आले होते. सदर प्रशिक्षणामध्ये नागपूर मध्यवर्ती कारागृहातील 40 महिला बंदी व 79 पुरुष बंद्यानी तसेच 41 महिला कर्मचारी व महिला कुटुंबियांनी सहभाग घेतला होता.

तसेच मुंबई सर्वोदय मंडळ व सहयोग ट्रस्ट नागपूर यांचे तर्फे विविध गटांमध्ये "गांधी विचारधारा" निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकुण 81 पुरुष व महिला बंद्यानी सहभाग घेतला होता. महात्मा गांधीजी नेहमी तुरुंगाला शिक्षा केंद्र न मानता सुधारगृह मानत असत. गुन्हा हा एक आजार आहे आणि गुन्हेगार हा एक समाजव्यवस्थेचा बळी आहे, त्यामुळे तुरुंग अधिकाऱ्याने एका डॉक्टर प्रमाणे त्यावर उपचार करणे आवश्यक आहे. अशा महात्मा गांधींजीच्या विचारसरणीची कारागृहातील बंदयांना सवय लागावी याकरीता दरवर्षी 2 ऑक्टोंबर रोजी महात्मा गांधीजी यांचे जयंती निमित्य कारागृहात गांधी विचारधारा निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.



सदर प्रशिक्षणामध्ये तसेच निबंध स्पर्धेमध्ये उत्कृष्ठ कामगीरी करणाऱ्या महिला व पुरुष बंदयांना व महिला कर्मचारी व महिला कुटुंबियांना दिनांक 25.04.2026 रोजी प्रमुख अतिथी सन्मा.न्यायमुर्ती श्री.अनिल एस.किलोर साहेब, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर, सन्मा.न्यायमुर्ती श्रीमती उर्मिला जोशी फळके मॅडम उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर व वरिष्ठ ॲड. देवेंद्रकुमार चव्हाण साहेब, मुख्य शासकिय अभियोक्ता उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

बंदयांनी तयार केलेल्या वस्तु समाजातील लोकांपर्यंत पोहचाव्यात व बंदयांना देखील कारागृहात रोजगार उपलब्ध व्हावा, तसेच कारागृहातुन बंदी मुक्त झाल्यानंतर पुन्हा गुन्हेगारीकडे न वळता सुशिक्षित नागरीक म्हणून त्यास आपली उपजिविका पार पाडता यावी व स्वत:चे व कुटुंबाचे पालन-पोषण करता यावे, यासाठी कारागृहात बंदयांना विविध प्रकारचे व्यवसायाभिमुक प्रशिक्षण देवून प्रमाणपत्र देण्यात येते.

कार्यक्रमाचे सुरवातीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कारागृहात वृक्षारोपन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी कारागृहाचे कारखाना विभागात बंदयामार्फत तयार करण्यात आलेल्या कारागृह निर्मित वस्तुंची पाहणी केली व खरेदी करुन बंदी कौशल्याचे कौतुक केले.

सदर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सन्मा.न्यायमुर्ती श्रीमती उर्मिला जोशी फाळके मॅडम यांनी बंदयांनी प्रशिक्षणादरम्यान बनविलेल्या हस्तकला वस्तुंचे कौतुक केले व कोणताच माणुस हा जन्माजात गुन्हेगार नसतो उद्भवलेल्या परिस्थितीमुळे तो गुन्हेगार ठरत असतो. त्यामुळे बंदयांनी कारागृहात घेतलेल्या प्रशिक्षणाचा फायदा निश्चितच कारागृहातुन सुटल्यानंतर होईल. त्यामुळे प्रत्येक बंदयांनी अशा प्रकारच्या प्रशिक्षणात सहभागी व्हावे असे मोलाचे मार्गदशन केले.

तसेच प्रमुख अतिथी सन्मा. न्यायमुर्ती श्री. अनिल एस. किलोर साहेब यांनी बंद्याना कारागृह शिक्षा भोगत असतांना सकारात्मक विचार ठेवावा यासाठी दैनंदीन मेडीटेशन व योगाभ्यास करावा, सकारात्मक विचारसरणी करीता आपल्या बुध्दीकौशल्याचा वापर करुन मनावर नियंत्रण ठेवावे व सतत काहीतरी नविन निर्माण करण्याचा प्रयत्न करावा, यासाठी कारागृहामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रशिक्षणामध्ये व उपक्रमामध्ये सहभागी होवून स्वत:ला व्यस्त ठेवावे असे मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच अशा प्रकारचे प्रशिक्षण कारागृहामध्ये राबविणेकरीता कारागृह प्रशासनाचे कौतुक केले. तसेच अशाप्रकारचे उपक्रम सतत कारागृहात राबविण्यात यावे असे मोलाचे मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती दिपा वै. आगे, अति. अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह व आभार प्रदर्शन श्री. वैभव सु. आगे, अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांनी केले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. भीमराव राऊत, वरिष्ठ तुरूंग अधिकारी, श्री. वामन निमजे, वरिष्ठ तुरूंग अधिकारी, श्री. यशवंत बनकर, तुरुंगाधिकारी, श्री. संतोष मदने, तुरुंगाधिकारी, श्री. गणपत खोकले, शिक्षक, श्रीमती स्वाती भगत शिक्षिका, तसेच कारागृह कर्मचारी श्री. विठ्ठल उगले, सुभेदार, श्री. संजय गायकवाड, हवालदार, श्री. प्रमोद चामट, श्री. सुभाषचंद्र शाहू, श्री. धर्मपाल शेंदरे, शिपाई व श्रीमती प्रमीला शर्मा, महिला शिपाई तसेच श्री धनपाल मेश्राम, श्री कृष्णा पाडावी, श्रीमती मीना लाटकर, सामाजिक कार्यकर्ता यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सदरचे हस्तकला प्रशिक्षण पिडललाईट इंडीया या कंपनीचे विभागीय सेल्स मॅनेजर श्री. मंगेश इंगोले यांच्या सौजन्याने प्रशिक्षक श्रीमती प्राजक्ता लुले यांचे मार्फत देण्यात आले. तसेच गांधी विचार परीक्षा मुंबई सर्वोदय मंडळाचे सदस्य ॲड. स्मिता सिंगलकर व डॉ. रविंद्र भुसारी यांचे मार्फत कारागृहात गांधी विचारधारा परीक्षा घेण्यात आली.

# NMMS परीक्षेत जासई हायस्कूल विद्यालयाला घवघवीत यश !!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** रयत शिक्षण संस्थेचे, श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि बा पाटील जूनियर कॉलेज जासई .या विद्यालयात सन २०२५ - २६ या शैक्षणिक वर्षात दरवर्षीप्रमाणे घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक परीक्षा (NMMS) ही परीक्षा शासनाकडून दरवर्षी घेण्यात येते. या परीक्षेसाठी आमच्या विद्यालयातील एकूण २७ विद्यार्थी बसले होते त्यापैकी १५ विद्यार्थी या परीक्षेला पास झाले. व ९ विद्यार्थ्यांना NMMS परीक्षेची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना दरवर्षी १२००० याप्रमाणे ४ वर्ष ४८ हजार रुपयाची शिष्यवृत्ती मिळणार आहे. ते विद्यार्थी पुढील प्रमाणे कारंडे सक्षम, हिप्परकर मानसी, दडस हर्षद, धुमाळ गायत्री, जायभाय मयुरी, काळे अभय, नाळे श्रुती, मुरकुटे प्राची, वाठोरे आर्यन या विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका शिक्षकांना वेळोवेळी स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करणाऱ्या सौ म्हात्रे के जी मॅडम, उपमुख्याध्यापक श्री कुटे सर, पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम यांनी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे व विभाग प्रमुख सौ ठाकूर एस ए मॅडम




व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षक वृंदाचे गुलाब पुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या उपशिक्षिका सौ वर्तक डी आर मॅडम यांनी केले.

# स्पीड बर्ड बॅडमिंटन पॉईंटवर आमदार गजाननभाऊ लवटे यांची हजेरी, मित्रांसोबत रंगला बॅडमिंटनचा डाव

**दैनिक युवक आधार**

**संतोषराव घोडेराव, तालुका प्रतिनिधी :** परतवाडा रोडवरील इच्छा हॉटेल परिसरात असलेल्या "स्पीड बर्ड बॅडमिंटन पॉईंट" येथे आज पहाटे क्रीडा प्रेमींसाठी एक अनोखा प्रसंग अनुभवायला मिळाला. दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. गजाननभाऊ लवटे यांनी आज रविवार, 26 एप्रिल रोजी सकाळी सुमारे 6 वाजता बॅडमिंटन कोर्टवर हजेरी लावत मित्रमंडळींसोबत बॅडमिंटन खेळण्याचा मनसोक्त आनंद लुटला.

पहाटेच्या प्रसन्न वातावरणात आमदार लवटे यांनी ट्रॅकसूट परिधान करून कोर्टवर प्रवेश केला. स्थानिक खेळाडू



आणि मित्रपरिवारासोबत त्यांनी सुमारे तासभर बॅडमिंटनचे सामने खेळले. यावेळी त्यांचा उत्साह आणि खेळातील कौशल्य पाहून उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

**"निरोगी शरीरातच निरोगी मन वसते" - आ. लवटे**

खेळानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना आ. गजाननभाऊ लवटे म्हणाले, "आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे दुर्लक्ष होते. बॅडमिंटनसारखे खेळ शरीर आणि मन दोन्ही तंदुरुस्त ठेवतात. तरुणांनी मैदानी खेळांकडे वळावे, यासाठी मी स्वतः मैदानात उतरलो आहे. अंजनगाव सुर्जी आणि दर्यापूर मतदारसंघात क्रीडा संस्कृती वाढावी, यासाठी माझे प्रयत्न सुरू आहेत."

ते पुढे म्हणाले की, "स्पीड बर्ड बॅडमिंटन पॉईंट" सारखी अद्ययावत सुविधा अंजनगाव सुर्जी परिसरातील खेळाडूंसाठी उपलब्ध झाली ही अभिमानाची बाब आहे. स्थानिक युवकांनी या सुविधेचा लाभ घेऊन राज्य व राष्ट्रीय पातळीवर नाव कमवावे.

**स्थानिकांमध्ये उत्साहाचे वातावरण**

आमदारांनी पहाटे-पहाटे बॅडमिंटन कोर्टवर येऊन सर्वसामान्य खेळाडूंसोबत खेळण्याने स्थानिकांमध्ये कमालीचा उत्साह संचारला होता. अनेक युवकांनी आमदारांसोबत सेल्फी काढत या क्षणांना कॅमेऱ्यात कैद केले. "आमदार साहेब जमिनीवरचे नेते आहेत. आमच्यात येऊन ते खेळले, याचा आम्हाला आनंद आहे," अशी प्रतिक्रिया एका स्थानिक खेळाडूने दिली.

स्पीड बर्ड बॅडमिंटन पॉईंटचे संचालक यांनी सांगितले की, आमदार महोदयांच्या भेटीमुळे आमच्या अकादमीतील खेळाडूंचा हुरूप वाढला आहे. भविष्यात येथे तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा आयोजित करण्याचा आमचा मानस आहे. दरम्यान, आ. लवटे यांनी दररोज पहाटे किमान एक तास व्यायाम आणि खेळासाठी देण्याचे आवाहन नागरिकांना केले.

# शिवाजी कोण होता...? या पुस्तकाचे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने परंडा येथे सामूहिक वाचन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे धाराशिव** - जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने परंडा येथे शिवाजी कोण होता या गोविंद पानसरे लिखित पुस्तकाचे वाचन करण्यात आले

कॉ. गोविंद पानसरे यांनी लिहिलेले 'शिवाजी कोण होता?' हे पुस्तक हे 'कुलवाडी भूषण, बहुजन प्रतिपालक, छत्रपती शिवाजी महाराजांची खरी प्रतिमा या पुस्तकांमधून त्यांनी मांडली पण इथल्या काही लोकांनी महापुरुषां चे विचार स्वतःच्या सोयीची छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा लोकांसमोर मांडण्याचे षडयंत्र रचले आहे, हे षडयंत्र उद्ध्वस्त करण्याचे काम 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाने केले आहे.

**"शिवाजी कोण होता?"**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर कॉ.गोंविद पानसरे लिखित असलेले शिवाजी




कोण होता हे पुस्तकाच्या प्रकाशकाला आमदार संजय गायकवाड यांनी अर्वाचे शिवीगाळ करत त्यांना धमकी दिली या घटनेचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने परंडा येथे निषेध व्यक्त केला वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड. प्रकाश आंबेडकर यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना आदेश दिले होते की प्रत्येक जिल्ह्यामध्ये शिवाजी कोण होता या पुस्तकाचे सामूहिक वाचन चौकाचौकामध्ये करा या आव्हानास प्रतिसाद देत परंडा येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवाजी कोण होता? या पुस्तकाचं सामूहिक वाचन करण्यात आले. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष मोहन बनसोडे शहराध्यक्ष किरण बनसोडे तालुका महासचिव विलास जाधव ज्येष्ठ साहित्यिक तू दा गंगावणे माजी नगरसेवक राहुल बनसोडे फुले आंबेडकर विद्वत सभेचे जिल्हा समन्वयक डॉ.अनंत देडगे घनश्याम शिंदे नवनाथ गावडे रामदास थिटे पोपट बनसोडे उपस्थित होते.

# अविस्मरणीय क्षण : विदर्भवाद्यांच्या संवादातून नवी ऊर्जा

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** : प्रखर विदर्भवादी, ज्ञानतपस्वी धनराजजी बोबडे यांच्या निवासस्थानी विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या पदाधिकाऱ्यांची अर्थपूर्ण भेट पार पडली. या भेटीत महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष श्रीमती रंजनाताई मामर्डे, सर्वोच्च नारी शक्ती राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त लोकगायिका व कवयित्री श्रीमती झिंगुबाई बोलके, कोअर कमिटी सदस्या डॉ. पद्माताई राजपूत तसेच पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत उपस्थित होते.



या प्रसंगी बोबडे सरांनी स्वतंत्र विदर्भ राज्य चळवळीचा समृद्ध इतिहास, वर्तमान परिस्थिती आणि भविष्यातील दिशा यावर सखोल मार्गदर्शन केले. वयाच्या ९३ व्या वर्षीही त्यांचा उत्साह, तल्लख स्मरणशक्ती, अफाट वाचन आणि समाजकार्यावरील निष्ठा उपस्थितांना प्रेरणादायी ठरली. त्यांनी डॉ. श्रीनिवास खांदेवाले व नरेश निमजे लिखित "महाराष्ट्रात राहण्याचा अनुभव आणि विदर्भ राज्याची अपरिहार्यता" या पुस्तकाचे वाचन सुरू असल्याचे सांगत ज्ञानार्जनाची त्यांची अखंड जिद्द अधोरेखित केली.

समितीची पुढील वाटचाल जाणून घेण्याच्या उत्सुकतेतून त्यांनी "मिशन २०२७" संदर्भात सविस्तर चर्चा केली. यावेळी समितीचे अध्यक्ष ॲड. वामनराव चटप यांच्या नेतृत्वाखालील नियोजनाची माहिती देण्यात आली. तसेच श्रीमती रंजनाताई मामर्डे लिखित "विदर्भ मुक्ती : एक संघर्ष यात्रा" हे पुस्तक भविष्यात ऐतिहासिक दस्तऐवज ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यापूर्वी दूरध्वनीवरून संवाद झालेला असला तरी प्रत्यक्ष भेटीचा योग प्रा. मेघा कोटक यांच्या विवाह सोहळ्याच्या निमित्ताने साधला. या कौटुंबिक भेटीत झालेला विदर्भ विषयक संवाद सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला.जय विदर्भ, जय जय विदर्भ!

# मुंबई ते गोरखपूर रेल्वेच्या १२४ फेऱ्यांची घोषणा ; जळगाव, भुसावळ स्थानकांवर थांबा!

**जळगाव :** मध्य रेल्वेने उन्हाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मुंबई (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) ते गोरखपूर या अत्यंत व्यस्त मार्गावर ग्रीष्मकालीन विशेष गाड्यांची घोषणा केली आहे. या उपक्रमाअंतर्गत एकूण १२४ विशेष फेऱ्या चालवण्यात येणार असून, दोन्ही दिशांना प्रत्येकी ६२ सेवा उपलब्ध असतील. या अतिरिक्त गाड्यांमुळे जळगाव, भुसावळहून मुंबईकडे ये-जा करणाऱ्या प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

गाडी क्रमांक ०१०७९ ही छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबईहून गोरखपूरकडे दररोज रात्री १०:३० वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी सकाळी १०:०० वाजता गोरखपूर येथे पोहोचेल. ही सेवा १५ मेपासून १५ जुलैपर्यंतच्या कालावधीत चालवली जाईल. एकूण ६२ फेऱ्या होणार आहेत. त्याचप्रमाणे गाडी क्रमांक ०१०८० ही गोरखपूरहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबईकडे दररोज दुपारी ०२:३० वाजता सुटेल. आणि तिसऱ्या दिवशी पहाटे ००:४० वाजता मुंबईत पोहोचेल. ही सेवा १७ मेपासून १७ जुलैपर्यंतच्या कालावधीत सुरु राहील. यातही ६२ फेऱ्यांचा समावेश आहे.

दोन्ही विशेष गाड्यांचे थांबे प्रवाशांच्या सोयीसाठी महत्त्वाच्या स्थानकांवर ठेवण्यात आले आहेत. यात दादरसह ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, खंडवा, इटारसी, भोपाळ, बीना, वीरांगना लक्ष्मीबाई झांसी, उरई, कानपूर सेंट्रल, लखनऊ, गोंडा, बस्ती आणि खलीलाबाद या स्थानकांचा समावेश आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# चिरनेर अक्कादेवी वाडीला धान्य साठवण टाकीचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी :** सामाजिक कार्याचे दातृत्व जपत. एकत्र आलेल्या स्नेहबंध समूहाचा आज वार्षिक गेट-टुगेदर मेळावा चिरनेर येथील ऐतिहासिक भूमित अक्कादेवी डोंगरावर संपन्न झाला. या वार्षिक कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप , आदिवासी बांधवांना धान्य साठवण टाकीचे वाटप , शालेय विद्यार्थ्यांना स्नेह भोजन आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

कोंढरी करंजा येथील शिक्षण प्रेमी दिनेश नारायण म्हात्रे आणि स्नेहबंध समूह उरण यांच्या संयुक्त विद्यमानानेहा उपक्रम करण्यात आला यावेळी मुख्याध्यापक विश्वनाथ पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले, समाजाच्या उन्नतीसाठी आपल्या उत्पन्नाचा एक वाटा समाजासाठी अर्पण करावा ही संकल्पना प्रत्यक्षात राबविणाऱ्या दिनेश म्हात्रे आणि स्नेहबंध समूहाचे



मच्छिंद्र म्हात्रे यांनी आपल्या प्रस्ताविकेतून कौतुक केले. मानवी जीवन हे एखाद्या वृक्षा प्रमाणे परोपकारी झाले पाहिजे यासाठी प्रत्येकाने धडपडत रहावे असे आवाहन देखील उरण कोमसापचे अध्यक्ष श्री मच्छिंद्र म्हात्रे यांयावेळी केले.

सदर कार्यक्रमास शिक्षण प्रेमी दिनेश म्हात्रे, महाराष्ट्र राज्य शिक्षक संघा उरण तालुका अध्यक्ष महेंद्र गावंड,उरण शिक्षक पतपेढीच्या संचालिका शर्मिला गावंड, चिरनेर ग्रामपंचायत उपसरपंच दीपक कातकरी ,सेवानिवृत्त मुख्याध्यापक केशव गावंड, विकास पाटील, मनोहर वर्तक, दिशा तांडेल प्रमिला गावंड, संगिता गावंड प्रतिभा लहाशे संगिता म्हात्रे, प्रतिभा पाटील, संपदा चव्हाण, विनिता पाटील, पांडूरंग ठाकूर, अखिलेश ठाकूर,अनिकेत नाईक, भारती बगाटे, जलतरणपटू मयंक म्हात्रे आदि मान्यवर उपस्थित होते. स्नेहबंध समूहाच्या वार्षिक मेळाव्यात मी काही क्षण जोडलो गेलो,हे क्षण माझ्या साठी केवळ क्षण नसून गुरुजणांचे आशीर्वाद आहेत ,हे आशीर्वाद मला सा माजिक कार्यासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरतील असे गौरवोद्गार दिनेश म्हात्रे यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते चिरनर अक्कादेवी वाडी येथील 40 आदिवासी बांधवांना धान्य साठवण टाक्यांचे वाटप करण्यात आले.

# अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, विदर्भ प्रांत आयोजित 'प्रिय यशवंतराव' कार्यक्रम संघभूमी नागपूर येथे उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**राहुल मडावी नागपूर :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) विदर्भ प्रांतातर्फे, यशवंतराव केळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने शनिवार, २५ एप्रिल २०२६ रोजी 'प्रिय यशवंतराव' हा व्याख्यान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. नागपूर येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात अत्यंत भव्य आणि उत्साही वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात विदर्भ प्रांताचे कायमस्वरूपी आणि विद्यमान कार्यकर्ते, तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे परमपूजनीय सरसंघचालक मोहनजी भागवत हे या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते; तसेच अभाविपचे राष्ट्रीय संघटन मंत्री श्री आशिष चौहान यांच्या विशेष



उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला एक आगळीच प्रतिष्ठा प्राप्त झाली. हा कार्यक्रम प्रामुख्याने अभाविपच्या कार्यकर्त्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. यशवंतराव केळकर यांचे देशभक्तीपर विचार, संघटनात्मक दृष्टीकोन आणि युवाशक्तीवरील विश्वास याप्रती असलेल्या समर्पणाचे स्मरण करणे, तसेच त्यांच्या आदर्शांपासून नवी पिढी आणि कार्यकर्त्यांना प्रेरणा देणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

'ज्ञान, शील आणि एकता' या तत्त्वांवर आधारित, तसेच आजही अभाविपच्या कार्यपद्धतीचा मूळ पाया असलेल्या केळकर यांच्या विचारांचे आणि मूल्यांचे स्मरण करून, ती मूल्ये अंगीकारण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. उपस्थित कार्यकर्ते आणि तरुणांनी केळकर यांच्या व्यक्तिमत्त्वापासून आणि त्यांच्या कर्तव्यनिष्ठेपासून प्रेरणा घेतली.

आपल्या मार्गदर्शनात्मक भाषणात परमपूजनीय सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी यशवंतराव केळकर यांच्या कार्याचे आणि विचारांचे चिंतन सुरू केले. त्यांनी स्पष्ट केले की, प्रा. केळकर यांनी घालून दिलेली कार्यपद्धती 'शाश्वत' स्वरूपाची आहे; जी समाज आणि राष्ट्र उभारणीसाठी आजही तितकीच प्रासंगिक आणि उपयुक्त आहे. ज्ञान आणि कर्म हेच भक्तीचा आधार आहेत आणि हीच भावना युवाशक्तीला योग्य दिशा देऊ शकते, असे त्यांनी अधोरेखित केले. डॉ. भागवत यांनी तरुणांना आवाहन केले की, प्रा. केळकर यांच्यासारख्या महान व्यक्तिमत्त्वांना आपला आदर्श मानून, येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणेचा एक अखंड स्रोत निर्माण करावा.

आपल्या संबोधनात राष्ट्रीय संघटन मंत्री श्री आशिष चौहान यांनी असे प्रतिपादन केले की, एका सशक्त संघटनेची उभारणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे; कारण एक कणखर आणि आदर्श व्यक्तिमत्त्व हाच सशक्त संघटनेचा भक्कम पाया असतो. केवळ संघटनेचा विस्तार करणेच नव्हे, तर आजच्या काळात राष्ट्राप्रती आपली नेमकी कर्तव्ये कोणती आहेत, याचे चिंतन करणेही तितकेच आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्र हे केवळ ज्ञानप्राप्तीचे एक माध्यम नसून, ते सामाजिक परिवर्तनाचे नवे मार्ग प्रशस्त करणारे एक प्रभावी साधन आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला. 'वाला' हा एक प्रभावी विभाग आहे. कार्यक्रमाच्या समारोपाप्रसंगी, अभाविपचे विदर्भ प्रांत अध्यक्ष श्रीकांत पर्वत यांनी उपस्थित पाहुणे, कार्यकर्ते आणि युवकांचे आभार मानले. कार्यक्रमादरम्यान मंचावर प्रामुख्याने परमपूज्य डॉ. मोहनजी भागवत, राष्ट्रीय संघटन मंत्री श्री आशिष चौहान, राष्ट्रीय मंत्री पायल किनाके, विदर्भ प्रांत अध्यक्ष डॉ. श्रीकांत पर्वत आणि प्रांत मंत्री देवाशिष गोतार्कर उपस्थित होते.

# अनुसूचित जाती-जमाती महिलांप्रमाणे ओबीसी महिलांनाही स्वतंत्र प्रतिनिधित्व द्यावे

## पनवेल काँग्रेस भवनात पत्रकार परिषदेत काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्षा संध्या सव्वालाखे यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** २०२३ साली संसदेत मंजूर झालेल्या महिला आरक्षण विधेयकाची त्वरित अंमलबजावणी करावी, तसेच अनुसूचित जाती-जमाती महिलांप्रमाणे ओबीसी महिलांनाही स्वतंत्र प्रतिनिधित्व द्यावे, अशी जोरदार मागणी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे यांनी सोमवार दि. २७ एप्रिल रोजी पनवेल काँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली.

यावेळी त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधताना महिला आरक्षण विधेयक हे प्रत्यक्षात महिलांना न्याय देण्यासाठी नसून राजकीय फायद्यासाठी आणण्यात आल्याचा आरोप केला. "दि. १६ आणि १७ एप्रिल रोजी लोकसभेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले. त्यावेळी महिला आरक्षणाचे बिल असल्याचे सांगण्यात आले, मात्र प्रत्यक्षात ते डिलिमिटेशनशी जोडलेले बिल होते. काही राज्यांमध्ये निवडणुकीत फायदा व्हावा आणि भाजप कायम सत्तेत राहावी, या उद्देशाने हे विधेयक आणण्यात आले," असा आरोप त्यांनी केला.

त्या पुढे म्हणाल्या, "जर सरकारला महिला आरक्षण खरोखरच लागू करायचे होते, तर २०२३ मध्ये मंजूर झालेले




विधेयक २०२४ पासून लागू करता आले असते. मात्र तसे झाले नाही. आमची मागणी आहे की २०२६ ची जनगणना तातडीने करावी आणि त्यानुसार आरक्षण लागू करावे. तसेच एससी आणि एसटी महिलांप्रमाणेच ओबीसी महिलांनाही प्रतिनिधित्व द्यावे. आमच्या या मागण्या मान्य झाल्यास आम्ही या विधेयकाला पूर्ण समर्थन देऊ." सरकारवर टीका करताना त्यांनी "हे सरकार फसवे असून महिलांना केवळ आश्वासने देत आहे," असा घणाघात केला.

या वेळी पनवेल काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, प्रदेश सचिव श्रुती म्हात्रे, नगरसेवक हरेश केणी, नगरसेवक लतीफ शेख, नगरसेविका लीला कातकरी, कार्याध्यक्ष शशिकला सिंह, निर्मला म्हात्रे, शैलेश पाटणे, अमित दवे, सुरेश पाटील, अरुण कुंभार, प्रितेश साहू, हेमराज म्हात्रे, आरती ठाकूर, सुदेशना रायते, जयश्री खटकले, दीपा ढोले, चेतन म्हात्रे, बबन केणी, जयवंत देशमुख, अखिल अधिकारी, शाहीद मुल्ला, स्वराज पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत संध्या सव्वालाखे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या सुरक्षा कृतीवर आरोप केले. "नुकतेच मी नागपूरहून विमानाने प्रवास करत असताना मोहन भागवत माझ्या शेजारच्या पहिल्या सीटवर बसले होते. त्यावेळी त्यांच्या सुरक्षारक्षकांनी मला प्रसाधनगृहासाठी देखील उठू दिले नाही. त्यावेळी माझी प्रकृती ठीक नव्हती. माझ्यासारख्या महिलेलाही वेठीस धरले गेले. हाच का या सरकारचा महिलांप्रती सन्मान?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

**चित्रा वाघ यांच्यावर निशाणा-**

भाजप नेत्या चित्रा वाघ यांच्यावर टीका करताना सव्वालाखे म्हणाल्या, "चित्रा वाघ या महिलांच्या बाजूने कधीच उभ्या राहिलेल्या नाहीत. जर त्या खऱ्या अर्थाने महिलांच्या बाजूने असतील, तर नाशिक प्रकरणात रूपाली चाकणकर यांच्या संदर्भात त्यांनी स्पष्ट भूमिका घ्यावी." तसेच, "माझ्यासमोर बसून त्यांनी प्रश्नांची उत्तरे द्यावीत," असे खुले आव्हानही त्यांनी दिले. महिला आरक्षणावर बोलताना "तुम्ही आमदार झालात म्हणून महिलांचे दुःख समजेलच असे नाही. आजही ओबीसी महिला आरक्षणापासून दूर आहेत. त्यांना मुख्य प्रवाहात आणले पाहिजे," असे त्या म्हणाल्या.

**धिरेंद्र शास्त्रींविरोधात आंदोलन-**

पत्रकार परिषदेनंतर बागेश्वर धामचे धिरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या विधानाविरोधात काँग्रेसतर्फे निषेध आंदोलन करण्यात आले. धिरेंद्र शास्त्री यांच्या छायाचित्राला जोडे मारो आंदोलन करण्यात आले. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी "छत्रपती शिवाजी महाराज की जय" अशा जोरदार घोषणा देत तीव्र संताप व्यक्त केला. तसेच धिरेंद्र शास्त्री यांचे छायाचित्र पायदळी तुडवत निषेध नोंदविण्यात आला.

# विक्रोळीत महात्मा फुले व कन्नमवार यांचे पूर्णाकृती पुतळे उभारा

## शंकर ढमाले यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (नासिकेत पानसरे):** विक्रोळीतील कन्नमवार नगर परिसरात महात्मा ज्योतिबा फुले आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांची उभारणी करण्याची जोरदार मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विक्रोळी विधानसभा संघटक शंकर ऊर्फ नाना ढमाले यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, विक्रोळीचे आमदार सुनील राऊत तसेच कन्नमवार नगरच्या नगरसेविका सुनिता चंद्रशेखर जाधव यांना निवेदन सादर केले आहे.

कन्नमवार नगर ही म्हाडाची आशिया खंडातील सर्वात मोठी वसाहत म्हणून ओळखली जाते. मात्र, या परिसरात मोठ्या प्रमाणावर पुनर्विकास होत असताना, येथील ऐतिहासिक आणि सामाजिक वारसा जपण्यासाठी कोणतेही ठोस पाऊल उचलले जात नसल्याची





खंत ढमाले यांनी व्यक्त केली.

मुंबई महानगरपालिकेचे 'क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले सर्वसाधारण रुग्णालय' आता सुपर स्पेशालिटी रुग्णालयात रूपांतरित होत असून, यासाठी सुमारे ५९३ कोटी रुपयांचा खर्च करून १३ आणि २१ मजली इमारती उभारल्या जाणार आहेत. मात्र, या रुग्णालयाच्या आवारात महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे कोणतेही नियोजन नसल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.सध्या महात्मा ज्योतिबा फुले यांची द्विजन्मशताब्दी वर्ष सुरू असताना, या स्मृतिवर्षात त्यांचा पुतळा उभारण्याची जबाबदारी महापालिका घेणार का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.तसेच, कन्नमवार नगराला नाव देणारे माजी मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार यांचेही या परिसरात कोणतेही ठळक स्मारक किंवा अस्तित्व दिसत नसल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे कन्नमवार नगरच्या प्रवेशद्वारावर भव्य कमान उभारून तसेच त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे स्मारक उभारावे, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

मुख्यमंत्री आणि कन्नमवार हे दोघेही विदर्भातील असल्याने या मागणीकडे गांभीर्याने लक्ष दिले जाईल, असा विश्वास ढमाले यांनी व्यक्त केला. तसेच, या प्रश्नासाठी आमदार सुनील राऊत विधानसभेत आणि नगरसेविका सुनिता जाधव महापालिकेत आवाज उठवतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# चार्ल्स रिश्टर आणि भूकंप

**दैनिक युवक आधार**
**नागपूर डॉ सुनिल भगत**

२६ एप्रिल १९०० भूकंप मापन पद्धतीचा शोध लावणारा संशोधक चार्ल्स रिश्टर याचा जन्म.

भूकंपाची तीव्रता '*रिश्टर स्केल'* मध्ये सांगतात. हे स्केल किंवा मोजपट्टी १ ते १० अंकांमध्ये विभागलेली असून, जितका अंक मोठा तितकी त्या भूकंपाची तीव्रता मोठी असते.

त्यातलं 'रिश्टर' हे एका वैज्ञानिकाचं आडनाव आहे, हे अनेकांना ठाऊक नाही. रिश्टर त्याच्या आईचं आडनाव. त्यांच्या आईवडिलांचा दोनदा घटस्फोट झाला. चार्ल्स व त्यांच्या मोठय़ा बहिणीनं आईचं आडनाव घेतलं व दोघंही आजोळीच वाढली. छोटय़ा चार्ल्सवर कौटुंबिक घटनांचा खोलवर परिणाम झाला.

खूपदा मनोविकार तज्ज्ञांचा सल्ला, औषधोपचार घ्यावे लागत. त्यातूनही सावरून त्यानं आपलं करिअर केलं.

पृथ्वीगोलाचं कंप पावणं युगायुगानं चालू आहे. पुष्कळदा ते समुद्राच्या पोटातलं असल्यानं आपल्याला जाणवत नाही. धरणीकंप व त्याचं विनाशकारी रूप मात्र भयभीत करणारं असतं.कॅलिफोर्नियात सातत्याने अनेक विनाशकारी भूकंप झाल्यामुळे, तिथे भूकंपशास्त्राचा अभ्यास १९२० च्या दरम्यान कुरू झाला. १९२७ मध्ये कॅल्टेकमध्ये भूकंपशास्त्र विभाग सुरू झाला. चार्ल्स रिश्टर यांची तिथे तात्पुरती नेमणूक होती.१९३० मध्ये जर्मनीच्या बेनो गुटेनबर्ग (१८८९-१९६०) या भूकंपशास्त्रज्ञाची विभागप्रमुख म्हणून सन्मानपूर्वक जास्त पगारावर नेमणूक करण्यात आली. कामाला दिशा मिळाली. चार्ल्स रिश्टर काही उत्तम तंत्रज्ञ नव्हते. मात्र गोळा केलेल्या प्रचंड माहितीचा, आकडेवारीचा व आलेखांचा सखोल अभ्यास करून ठोस निष्कर्ष काढण्यात ते वाकबगार होते. हा गुण हेरूनच बेनोंनी त्यांना सतत प्रोत्साहन दिलं. त्यातूनच हळूहळू 'रिश्टर्स स्केल' आकाराला आलं. त्यानंतर कॅलिफोर्निया राज्यात ५/६ भूकंप झाले. तेव्हा तीव्रतेसंबंधात 'रिश्टर' हा शब्द वारंवार वापरात आला. चार्ल्स रिश्टर अचानक व अनपेक्षितपणे प्रसिद्धीच्या झोतात येऊ लागले.

***सिस्मॉमीटर***

भूकंपमापनात 'सिस्मॉमीटर'वर जमिनीची थरथर आलेखाच्या स्वरूपात अखंडपणे नोंदवली जात असते. भूकंपाच्या लहरींची उंचसखलता मोजली जाते. मोठा धक्का बसतो तेव्हा आरेखन करणारं पेन वेगानं वरखाली फिरू लागतं. त्याकरिता 'लॉगॅरिथमिक' पद्धतीचा वापर करायची सूचना गुटेनबर्गनं केली. परिणामी १ ते १० अंकांमध्ये नोंद करायची सोपी



पद्धत चार्ल्सने विकसित केली. 'मॅग्निटय़ूड स्केल' म्हणून ही पद्धत ओळखली जाऊ लागली. यात फक्त १ ते १० अंक असून एकक (उनित) नाही.

***मॅग्निटय़ूड स्केल'***

पुढं १९६६ साली 'जिऑलॉजिकल सोसायटी ऑफ अमेरिका' या संस्थेनं एक ठराव करून 'मॅग्निटय़ूड स्केल' ऐवजी 'रिश्टर स्केल'चा वापर सुरू केला. 'स्केल' शब्दामुळे अनेकांना ती भूकंप मोजण्याची पट्टीच वाटे व ती "विकत" घेण्यासाठी चार्ल्सकडे वारंवार विचारणा होई.

***अणुऊर्जा व अण्वस्त्रांचं युग***

१९६० च्या सुमारास अणुऊर्जा व अण्वस्त्रांचं युग सुरू झालं. तिथं भूकंपविज्ञानाचा उपयोग झाला. अणुस्फोट चाचण्या भूकंपमापकांवरील तीव्र क्षमतेच्या लहरींमुळे उघडकीला येऊ लागल्या. वर्तमानपत्रं, टेलिव्हिजनवर चार्ल्स रिश्टर सेलिब्रिटी बनले. परिणामी त्यांच्या सहकारी वर्गात एक प्रकारची असूया वाढीस लागली. गुटेनबर्ग १९६० मध्येच मरण पावले होते. मात्र त्यांच्या बायकोनं पतीला योग्य ते श्रेय मिळत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. या सगळ्याकडे दुर्लक्ष करून चार्ल्स रिश्टर आपलं काम करतच होते. पुढे नवीन अणुऊर्जाप्रकल्प उभारताना भूकंपशास्त्रज्ञाचा सल्ला महत्त्वाचा ठरू लागला. सरकार दरबारात, नवीन बांधकामात, धरणांच्या व इमारतींच्या उभारणीत त्यांचा सल्ला आवर्जून मागितला जाऊ लागला. चार्ल्स रिश्टर यांचं 'एलिमेंटरी सिस्मॉलॉजी' हे पुस्तक आजही संदर्भ म्हणून वापरलं जातं.

भूकंप मॅग्नीटय़ूड (क्षमता) आणि इन्टेन्सिटी (तीव्रता) अशा दोन मानकात मोजतात. रिश्टर स्केल म्हणजे भूकंपाची मॅग्नीटय़ूम्ड मोजण्याचं एकक आहे. आता मॅग्नीटय़ूड म्हणजे काय, तर भूकंपाच्या वेळी पृथ्वीच्या पोटातून किती ऊर्जा बाहेर पडली ते मोजणं. रिश्टर स्केल हा लॉगरिथमिक स्केल आहे. सोप्या भाषेत सांगायचं म्हणजे,रिश्टर स्केल जेव्हा एका युनिटनं वाढतं तेव्हा ऊर्जा दहापटीनं वाढलेली असते. म्हणजे सात रिश्टर स्केलच्या धक्कयानं जी ऊर्जा बाहेर पडते ती सहा रिश्टर स्केलच्या धक्क्याच्या दहा पट जास्त असते आणि पाच रिश्टर स्केल धक्क्याच्या शंभर पट जास्त असते. साधारणपणे सहा ते साडे सहा रिश्टर स्केल शक्तीचा भूकंप असेल तर वरच्या बाजूला ३० ते ४० किलोमीटर जमीन फाटलेली आपल्याला दिसते. भूकंप सात रिश्टर स्केलचा असेल तर १०० किलोमीटरपर्यंत जमीन फाटलेली दिसते. तो आठचा असेल तर १५० ते २०० किलोमीटरपर्यंत जमीन फाटते.

***त्सुनामी आणि सर्वात मोठा भूकंप***

२६ डिसेंबर २००४ रोजी सर्वात मोठा इंडोनेशियामध्ये झालेला भूकंप ९ पेक्षा जास्त रिश्टर स्केलचा होता. त्यावेळी त्सुनामीही आली होती. अशा प्रचंड मोठ्या भूकंपामुळे ११०० किलोमीटरपर्यंत जमीन फाटली होती. जेवढी भूकंपाची ऊर्जा जास्त तेवढी जमीन फाटण्याची लांबीही जास्त असते.

**भूकंप ही एक नैसर्गिक प्रक्रिया**

असल्याने त्याला आपण आळा घालू शकणार नाही. आपल्याला पाऊस थांबवता येत नाही, वादळही आपण थांबवू शकत नाही. तसेच भूकंपाच्या बाबतीतही आहे. भूकंप पूर्वीही होत होते,

आताही ते होत आहेत आणि यापुढेही ते होत राहणार आहेत.'भूकंपानं माणसं मरत नाहीत तर इमारतींखाली गाडली जाऊन मरतात.'हा धडा कॅलिफोर्नियावासी शिकले. बाकीच्या जगाला अजून जाग यायची आहे.

**डॉ. सुनिल भगत**
**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती**
**नागपूर**

# भोंदू महेशगिरी प्रकरणात नवा ट्विस्ट! अंनिसच्या कार्यकर्त्याला लाच देण्याचा प्रयत्न

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : निफाड तालुक्यातील धारणगाव खडक येथील भोंदू महेशगिरी उर्फ महेश काकडे याच्याविरोधात दाखल झालेल्या गुन्ह्यानंतर या प्रकरणाला आता नवे वळण लागले आहे. प्रकरण मिटवून घेण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांना लाच देण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी चांदगुडे यांनी इंदिरानगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पाठपुराव्यामुळे भोंदू महेशगिरी काकडे याच्याविरोधात जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी त्याला अटक करून पाच दिवसांची पोलिस कोठडी मिळवली होती. या कारवाईनंतर त्याचा तथाकथित दरबार बंद पडला.

या कारवाईमुळे संतप्त झालेल्या महेशगिरीच्या निकटवर्तीयांनी प्रकरण मागे घेण्यासाठी हालचाली सुरू केल्या. महेशगिरीच्या भाच्याने एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यामार्फत कृष्णा चांदगुडे यांच्याशी संपर्क साधला. शुक्रवार दि. २४ एप्रिल रोजी सायंकाळी ६.५६ वाजता मोबाईलवर संपर्क साधून सुरुवातीला सामान्य चर्चा करण्यात आली. त्यानंतर प्रत्यक्ष भेट घेण्याची इच्छा व्यक्त करण्यात आली. मात्र, चांदगुडे यांनी स्पष्ट नकार देत, "जे काही बोलायचे आहे ते फोनवरच बोला," असे सांगितले.

**"लाच घेण्याप्रमाणे लाच देणे हाही गुन्हाच आहे. या प्रकारामुळे माझ्या आणि चळवळीच्या सामाजिक प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. भविष्यात असे प्रकार होऊ नयेत, यासाठीच तक्रार दाखल केली आहे."**

**कृष्णा चांदगुडे, राज्य कार्यवाह, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती**

यावेळी संबंधित व्यक्तीने महेशगिरीचे प्रकरण मिटवून घेण्यासाठी पैसे देण्याची तयारी असल्याचे सांगितले. हा प्रस्ताव ऐकताच चांदगुडे यांनी संबंधितास खडसावले. त्यानंतर त्यांनी तत्काळ अंनिसच्या सहकाऱ्यांना तसेच इंदिरानगर पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक मनोहर कारंडे यांना माहिती दिली आणि नंतर लेखी तक्रार दाखल केली.

या घटनेमुळे अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. लाच देण्याचाही गुन्हा तितकाच गंभीर असल्याने संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत पुढील कारवाई सुरू केल्याचे सांगितले.


# विजयाचा 'पंच'! स्व. माणिक पोदार लर्न स्कूलचा सलग पाचव्या वर्षी १००% निकाल

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी रणजीत सिंह ठाकुर** : शिक्षण क्षेत्रात आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवणाऱ्या येथील स्व. माणिक पोदार लर्न स्कूलने यंदाही आपल्या यशाचे सातत्य राखले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात शाळेने सलग पाचव्या वर्षी १००% निकालाची नोंद करून यशाचा 'पंच' पूर्ण केला आहे.

**यशाची दैदिप्यमान परंपरा**

स्व. माणिक पोदार लर्न स्कूलने गेल्या पाच वर्षांपासून निकालाची टक्केवारी १००% राखून शिक्षण क्षेत्रात आपला एक वेगळा ठसा उमटवला आहे. यंदाही शाळेतील सर्व विद्यार्थी सुयश संपादन करून उत्तीर्ण झाले आहेत. केवळ उत्तीर्णच नव्हे, तर अनेक विद्यार्थ्यांनी गुणवत्तेच्या यादीत स्थान मिळवत शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे.




**कठोर परिश्रम आणि मार्गदर्शनाचा विजय**

विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न, शिक्षकांचे अहोरात्र परिश्रम आणि शाळेने राबवलेले विविध उपक्रम यामुळेच हे यश शक्य झाले आहे. परीक्षेत उत्तम गुण मिळवण्यासाठी शाळेतर्फे विशेष सराव परीक्षा, शंका निरसन सत्रे आणि वैयक्तिक मार्गदर्शनावर भर देण्यात आला होता.

**अशाप्रकारे विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे उत्तम गुणवत्ता प्राप्त करीत भरघोस यश मिळवले."हे यश म्हणजे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या एकत्रित परिश्रमाचे फळ आहे. सलग पाच वर्षे १००% निकाल राखणे ही मोठी जबाबदारी होती, जी आम्ही सर्वांच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पाडली."**

**हर्षल वासेवाल - प्राचार्य -स्व. माणिक पोदार लर्न स्कूल, वाढोणा.**

**"सलग पाच वर्षे, १००% यश! हा केवळ आकडा नसून आमच्या शाळेची निष्ठा आणि विद्यार्थ्यांच्या परिश्रमाची पावती आहे. या यशात मोलाचा वाटा उचलणाऱ्या शिक्षक आणि पालकांचे मी आभार मानतो. स्व. माणिक पोदार लर्न स्कूलने हे यश साध्य केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो."पोदार स्कूल" नाव आज यशाचा समानार्थी शब्द बनले आहे याचा मनापासून आनंद वाटतो."**

**विनायक जाधव -संचालक स्व. माणिक पोदार लर्न स्कूल, वाढोणा.**

या निकालामध्ये खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

मेहुल बगडिया - 98%,श्रिया हवा - 95%,अक्षद खानझोडे - 94%, तेजल छित्तरका- 94%, कृष्णा अग्रवाल - 91%,आदित्य बबेरवाल - 91%,श्रावणी सरकटे - 91%,श्रद्धा खानझोडे - 91%,प्रतिक जायभाये - 91.00%, अर्णव मेश्राम - 91%, अथर्व पारीख - 90%,विराज देशमुख - 90%

# तलाठी कार्यालय बंद असल्याने नागरिकांचे हाल; तलाठी अधिकारी मस्त,"प्रशासन मात्र सुस्त"

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड राजू गायकवाड(मोहदरी) तालुका प्रतिनिधी** : उमरखेड तालुक्यातील बाळदी येथे लाखो रुपये खर्च करून सुसज्ज असे तलाठी कार्यालय उभारण्यात आले आहे. मात्र दुर्दैवाने हे कार्यालय पूर्णपणे रिकामे असून नागरिकांना मूलभूत महसूल सेवांसाठी दारोदारी हेलपाटे मारावे लागत आहेत. विशेष म्हणजे तलाठी कार्यालय बंद असतानाही तलाठ्यांचा कारभार हा तालुक्याच्या ठिकाणाहून चालतो. त्यामुळे गावामध्ये मोजकेच रिक्षा असल्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसात शेतकऱ्यांना खूप मोठे हाल सोसावे लागत आहे.

राज्य शासनाचा स्पष्ट आदेश आहे की तलाठी, कर्मचारी ज्या गावात नेमणूक आहे, त्या गावातच वास्तव्यास असणे बंधनकारक आहे. मात्र या आदेशाला केराची टोपली दाखवत तलाठी अधिकारी एकाच ठिकाणी बसून काम करत असल्याचे वास्तव समोर आले आहे. परिणामी, शेतकऱ्यांना, सामान्य



नागरिकांना दाखले, जमिनीचे फेरफार, सातबारा, उत्पन्न प्रमाणपत्र यांसारख्या महत्त्वाच्या कामांसाठी प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे.

तलाठी कार्यालय उघडे नसल्याने नागरिकांना वारंवार खाजगी ठिकाणी जावे लागत असून यात वेळ, पैसा आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. तालुक्याच्या ठिकाणी दरबार भरवणे म्हणजे भ्रष्टाचाराला थेट खतपाणी घालण्यासारखे प्रकार असल्याचे बोलले जात आहे. बंद अवस्थेत असलेले तलाठी कार्यालय दरवर्षी गवताच्या बाजारात राहिल्याचे चित्र दिसते.8 नोव्हेंबर 2025 रोजी अनेक वृत्तपत्रांमध्ये बातम्या प्रकाशित झाल्या होत्या.तेव्हा प्रशासनाने त्या बातम्यांची दखल घेत सर्व गवत साफ केले मात्र तलाठी कार्यालयामध्ये हजर राहण्यासाठी कोणतेही भूमिका घेतलेली नाही. त्याआधी पण 5 एप्रिल 2023 मध्ये प्रहार संघटनेने या संदर्भात निवेदन सुद्धा दिले होते. त्यामुळे त्या तलाठ्याला नेमकं अभय कोणाचे आहे हा प्रश्न जोर धरत आहे.तसेच शासनाच्या कोणत्या योजना आहेत हे देखील गावातील शेतकऱ्यांना माहित होत नाही त्यामुळे बाळदी गावातील नागरिकांनी या प्रकरणाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली असून त्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. लाखो रुपयाची सरकारी इमारती धूळ खात असताना अधिकारी मात्र राहत्या ठिकाणावरून मस्त'सत्ता चालवत' असल्याचे चित्र उमरखेडमध्ये सध्या बघायला मिळत आहे. यावर प्रशासन काय निर्णय घेणार याकडे सर्व गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रीय कर्मचारी सेनेचे अध्यक्ष मा.श्री किरण पावसकर यांच्या नेतृत्वाखाली मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील 92 विनाअनुदानित शाळांना अनुदान मंजूर झाल्याबद्दल आभार सभा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (शांताराम गुडेकर )** : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मान.श्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मा.आमदार, शिवसेना सचिव, प्रवक्ते आणि राष्ट्रीय कर्मचारी सेनेचे अध्यक्ष मा. श्री किरण पावसकर यांच्या नेतृत्वाखाली मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ९२ विनाअनुदानित शाळांना अनुदान मंजूर झाल्याबद्दल आभार मानण्यासाठी दिनांक २६/०४/२०२६ रोजी बाळासाहेब भवन येथे बैठक घेण्यात आली.या बैठकी मध्ये शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे आणि राष्ट्रीय कर्मचारी सेना अध्यक्ष श्री.किरण पावसकर यांचे मनापासून आपल्या भाषणात आभार व्यक्त केले.



श्री.किरण पावसकर यांनी आपल्या भाषणात सांगितले मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विनाअनुदानित शाळांना अनुदान सुरू करून शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्याच वाचवल्या तसेच मराठी शाळा बंद होण्याच्या मार्गावर आल्या होत्या त्या मराठी शाळांना मराठी भाषेला जिवंत ठेवण्याचे आणि अनुदान मंजूर करून देण्याचे काम फक्त आणि फक्त सन्माननीय उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबांमुळेच झाले. तसेच जे शिक्षक ७००० आणि ८००० रुपये महिना इतक्या कमी वेतनात काम करत होते आज त्या शिक्षकांना ५०,००० ते ६०,००० महिना पगार सुरू झाला याचे श्रेय शिंदे साहेबांनाच दिले पाहिजे. तसेच शिक्षण मंत्री श्री. दादाजी भुसे साहेब, शिक्षण समिती अध्यक्ष श्रीम. राजश्री शिरवाडकर, शिक्षण समिती सदस्य श्रीम.अंजली नाईक मुंबई महानगरपालिका शिवसेना गटनेते श्री. अमेय Spam, माजी शिक्षण समिती सदस्य श्री.मंगेश सातमकर यांच्या सहकार्यामुळे या निर्णयास जलदगती मिळाली असे सांगितले. याप्रसंगी सोबत राष्ट्रीय कर्मचारी सेना उपाध्यक्ष श्री. दिलीप नाईक श्री. संदीप जाधव चिटणीस श्री. तातू नाईक श्री. सचिन लिमन श्री.सचिन साळुंखे श्री. सुहास गायकवाड तसेच संस्थाचालक श्री. सुरेश लाखन श्री. विवेक थोरात श्री. विशाल बंडगर, राष्ट्रीय कर्मचारी सेना शिक्षण विभागाचे उपाध्यक्ष श्री. अमर पाचांगणे, सरचिटणीस संतोष रावताळे, जयदीप पाटील रमेश पवार, अरुण पवार, विनोद यादव, कार्यालय प्रमुख श्री. कार्तिक पवार व मोठ्या प्रमाणात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# सेवा निवृत्त कर्मचारीचे वर्षानुवर्षे थकीत ७ कोटी रुपयांपैकी ४ महिण्यातच ७७ लक्ष प्रदान




**दैनिक युवक आधार**

**बागलाण तालुका प्रतिनिधी- दिपक गायकवाड** : नगरपरिषदेच्या माध्यमातून लोक कल्याणकारी योजना राबवतानाच दिवसरात्र राबणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या हितालाही प्राधान्य देणाऱ्या सटाणा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष हर्षदा राहुलबाबा पाटील यांनी आपल्या अत्यंत अल्प, परंतु धडाकेबाज अशा ४ महिन्यांच्या कार्यकाळात एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून

नगरपरिषदेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्ष प्रलंबित असलेल्या ७ कोटी रुपयांच्या थकीत देण्यापैकी ७७ लक्ष रुपयांच्या सेवानिवृत्ती नंतरच्या लाभांचे प्रदान करून त्यांनी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.नगराध्यक्ष पदाची धुरा सांभाळल्यानंतर त्यांनी प्रशासकीय कामांचा आढावा घेताना कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाचे प्रश्न प्रलंबित असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. यावर तातडीने कार्यवाही करत, त्यांनी आवश्यक आर्थिक तरतूद सुनिश्चित केली आणि निवृत्त कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या हक्काचे ७७ लक्ष रुपये त्यांना धनादेशाद्वारे देण्याची प्रक्रिया पूर्ण केली.याप्रसंगी बोलताना नगराध्यक्ष म्हणाल्या "नगरपरिषदेची सेवा ही खऱ्या अर्थाने लोकसेवा असते, ज्यामध्ये कर्मचारी अहोरात्र काम करत असतात. सेवानिवृत्तीनंतर त्यांना त्यांच्या हक्काची रक्कम वेळेवर मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. ४ महिन्यांचा कार्यकाळ असो वा मोठा, जनहिताची आणि कर्मचारी हिताची कामे मार्गी लावणे हे माझे कर्तव्यच आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्य राखले जाईल."यावेळी मुख्याधिकारी ज्योती भगत पाटील, जनसंपर्क अधिकारी हिरालाल कापडणीस, आजी माजी सेवक संघटनेचे आनंदा काशिनाथ सोनवणे, किशोर आनंदा सोनवणे, सुभाष तुकाराम पाटील, पोपट लक्ष्मण सोनवणे, अण्णा रेवजी अहिरे, पोपट नागु सोनवणे, मनोज काशिराम सोनवणे, केवळ महादू अहिरे, विनायक पाकळे, लखन बोरसे आदी उपस्थित होते.

# परभणी जिल्ह्यात उष्णतेची लाट; निष्काळजीपणा टाळा, काळजी घ्या...!

जिल्ह्यात तापमानाचा पारा वाढत असून या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे. उन्हाची तीव्रता लक्षात घेता निष्काळजीपणा जीवघेणा ठरू शकतो. साध्या उपाययोजनांनीही मोठा धोका टाळता येतो, असे स्पष्ट करत त्यांनी नागरिकांना दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळण्याचा सल्ला दिला.

विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला आणि आजारी व्यक्ती यांनी अधिक दक्ष राहणे आवश्यक आहे. शरीरातील पाण्याची कमतरता आणि उष्णतेचा ताण यामुळे उष्माघाताचा धोका वाढतो. चक्कर येणे, अशक्तपणा, डोकेदुखी, उलट्या, जास्त घाम येणे किंवा अचानक बेशुद्धी अशी लक्षणे दिसल्यास विलंब न करता तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात उपचार घ्यावेत.

**आरोग्य यंत्रणेने सज्ज राहावे --**

उष्माघाताच्या पार्श्वभूमीवर सर्व आरोग्य केंद्रे, दवाखाने व रुग्णालयांनी पूर्ण तयारीत राहून उष्माघातग्रस्त रुग्णांच्या उपचारासाठी आवश्यक औषधांचा मुबलक साठा ठेवावा.

उष्माघात व्यवस्थापनासाठी स्वतंत्र कक्ष / बेड्स उपलब्ध ठेवावेत. 24x7 आपत्कालीन सेवा कार्यरत ठेवावी. वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना उष्माघात उपचाराबाबत सज्ज ठेवावे. गंभीर रुग्णांना तात्काळ उच्चस्तरीय रुग्णालयात रेफर करावे. तसेच कूलिंग सुविधा तत्पर ठेवाव्यात. वैद्यकीय व समवैद्यकीय कर्मचाऱ्यांना उष्माघात ओळख, प्राथमिक उपचार व तत्काळ प्रतिसाद याबाबत प्रशिक्षण द्यावे. नागरिकांमध्ये उष्माघात प्रतिबंधासाठी जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी जिल्हा रुग्णालय तसेच सर्व उपजिल्हा व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले.

**जनजागृती व स्थानिक प्रशासनाची भूमिका -**

- ग्रामपंचायत, नगरपालिका यांनी सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची (प्याऊ) व्यवस्था करावी
- बांधकाम, शेती व इतर मैदानी कामे सकाळी किंवा सायंकाळी करावीत
- आशा, अंगणवाडी सेविका यांच्या माध्यमातून घराघरात जनजागृती करावी.

**उष्माघाताची लक्षणे -**

- शरीराचे तापमान वाढणे (40°C किंवा अधिक)
- चक्कर येणे, डोकेदुखी
- मळमळ, उलट्या
- त्वचा गरम व कोरडी होणे
- अशक्तपणा किंवा बेशुद्ध पडणे

**प्राथमिक उपचार -**

- बाधित व्यक्तीस त्वरित थंड व सावलीच्या ठिकाणी हलवावे
- शरीरावर थंड पाण्याचे शेक/ पट्ट्या ठेवाव्यात
- कपडे सैल करावेत व पाणी/ ORS द्यावे
- तात्काळ नजीकच्या रुग्णालयात दाखल करावे.

**उष्मालाट काळात घ्यावयाची काळजी**

**काय करावे :--**

तहान नसली तरी पुरेसे पाणी प्या. गंभीर आजार असलेल्या व्यक्तींनी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच द्रवपदार्थ घ्यावेत.

ओआरएस, लिंबूपाणी, ताक, लस्सी, कैरीचे पन्हे, नारळपाणी यांसारखे द्रवपदार्थ घ्या. हलक्या रंगाचे, सैल व सुती कपडे परिधान करा. दुपारी १२ ते ३ या वेळेत बाहेर जाणे टाळा. बाहेर जाताना डोके झाका, टोपी/छत्री वापरा, गॉगल व सनस्क्रीनचा वापर करा. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व आजारी व्यक्तींची विशेष काळजी घ्या. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवा. अशक्तपणा, चक्कर, डोकेदुखी जाणवल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्या. घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर, सनशेडचा वापर करा. पशुधन सावलीत ठेवा व पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्या.

**काय टाळावे :-**

दुपारी उन्हात बाहेर जाणे व कष्टाची कामे करणे टाळा. अनवाणी बाहेर जाऊ नका. अतिउष्णतेच्या काळात स्वयंपाक टाळा. मद्यपान, चहा, कॉफी, शीतपेये टाळा. जास्त तेलकट, तिखट, मिठाचे व शिळे अन्न खाऊ नका. वाहनात लहान मुले किंवा प्राणी बंद करून ठेवू नका. गडद व जाड कपडे परिधान करणे टाळा. तापमान जास्त असल्यास शारीरिक श्रम टाळा. नागरिकांनी या सूचनांचे पालन करून स्वतःची व कुटुंबाची काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

**घराचे छत थंड ठेवण्यासाठी उपाय :**

कूल रूफ कोटिंग - छतावर पांढरा किंवा फिकट रंग लावा. त्यामुळे सूर्याची उष्णता परत जाते आणि घर ३–५°C ने थंड राहते.

ॲक्रेलिक / एलास्टोमेरिक कोटिंग - हे कोटिंग लावल्याने उष्णता कमी होते.

कूल टाईल्स - छतावर पांढऱ्या टाईल्स बसवल्यास उष्णता कमी आत येते.

छतावर बाग / गवत - जिथे शक्य असेल तिथे छोटे रोप किंवा गवत लावल्यास नैसर्गिक थंडावा मिळतो.

**जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण (जिल्हाधिकारी कार्यालय परभणी)**

# समस्त कक्कय्या समाज महासंघाचे महाअधिवेशन उत्साहात संपन्न; उपवर्गीकरणाला विरोधाचा ठराव एकमताने मंजूर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, (दत्ता खंदारे):** समस्त कक्कय्या समाज महासंघाचे भव्य महाअधिवेशन रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ रोजी मनोहर जोशी विद्यालय प्रांगण, धारावी डेपो, पी.एम.जी.पी. संकुलजवळ, धारावी, मुंबई येथे मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाले.

महासंघाचे अध्यक्ष श्री. निवृत्ती सावळकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या महाअधिवेशनाचे उद्घाटन माजी केंद्रीय गृहमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे, माजी आमदार श्री. ज्ञानराज चौगुले, माजी आमदार श्री. धर्माजी सोनकवडे, माजी आमदार श्री. बाबुराव माने व उमरगा पंचायत समितीच्या सभापती सौ. आकांक्षा चौगुले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व संत कक्कय्या यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले.

प्रारंभी सरचिटणीस श्री.प्रकाश दरवेशी यांनी प्रास्ताविक केले.अध्यक्ष श्री. निवृत्ती सावळकर यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी समाजातील बांधवांशी संवाद साधताना समाजातील एकजूट, शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व आणि आपल्या तरुणांनी प्रगतीसाठी कसे हिरीरीने पुढे आले पाहिजे, यावर ना रामदास आठवले साहेबांनी विचार मांडून त्यांना मार्गदर्शन केले.तर सुशील कुमार शिंदे (माजी गृहमंत्री )यांनी सुद्धा या समाजाला आर्थिक विकास महामंडळ मिळावे म्हूणन मी सरकारला पत्र लिहले.परंतु त्याचा विचार केला गेला नाही. सरकार बदलत राहतात. पण अजूनही वेळ गेली नाही महामंडळ नक्कीच मिळेल अशी आशा त्यांनी अधिवेशनात व्यक्त केली.

**महत्त्वाचे ठराव व मागण्या:**

१.उपवर्गीकरणाला विरोध: अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणामुळे समाजाचे आरक्षण धोक्यात येईल, असा इशारा देत श्री. विठ्ठल खरटमल व डॉ. रायप्पा कटके यांनी विरोधाचा ठराव मांडला. तो एकमताने मंजूर करण्यात आला.

२.आर्थिक विकास महामंडळ: समाजाच्या आर्थिक विकास महामंडळाच्या स्थापनेसाठी माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी लक्ष घालावे, अशी मागणी कार्याध्यक्ष श्री. हनुमंत सोनवणे यांनी केली. आमदार सौ. ज्योती गायकवाड यांनी महामंडळाला पाठिंबा जाहीर केला.

३.संत कक्कय्या भवन:मुंबईत येणाऱ्या समाजबांधवांसाठी 'संत कक्कय्या भवन' उभारण्याची मागणी उपाध्यक्ष श्री. अशोक खरटमल यांनी केली.

४.मासिक वर्गणी:तळागाळातील गरजू बांधवांच्या मदतीसाठी दरमहा १००रुपये वर्गणी जमा करण्याचा ठराव मंजूर झाला.

मान्यवरांचे विचार:

डॉ. पी. पी. पोळ यांनी संस्थापक श्री. मारुती सदाफुले यांच्या कार्याचा गौरव केला. ज्येष्ठ साहित्यिक ना. म. शिंदे म्हणाले, "धारावी हे समाजाचे मूळ स्थान आहे. आपण आपली ओळख लपवू नये. महासंघाने 'एक गाव, एक संघटना' धोरण राबवून जनगणना करावी." श्री. मुकुंद सोनटक्के यांनी, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर चालत जाती-जातीत भांडणे लावणाऱ्यांना बळी पडू नका," असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात श्री. निवृत्ती सावळकर म्हणाले, "समाजासाठी शेवटपर्यंत लढत राहीन. प्रत्येक जिल्ह्यात कक्कय्या भवन उभारण्यासाठी प्रयत्न करणार. उपवर्गीकरणाच्या अन्यायाविरोधात लढा उभारू." त्यांनी कार्यकर्त्यांचे कौतुक केले.

यावेळी समाजातील गुणवंतांचा समाजरत्न'व 'समाजभूषण' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.अधिवेशनास केंद्रीय मंत्री श्री. रामदास आठवले, आमदार सौ.ज्योती गायकवाड, नगरसेविका सौ. अर्चनाताई शिंदे, नगरसेवक श्री. भास्कर शेट्टी, नगर सेवक जोसेफ कोळी यांच्यासह हजारो समाजबांधव उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री. शशिकांत सोनवणे* यांनी केले तर श्री. मनोज शिंदे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने सांगता झाली.

# उरणमध्ये "कडक उन्हात 'माठ' चा थाट

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : एप्रिलच्या कडाक्याच्या उन्हाने हैराण झालेल्या उरणकरांना आता पुन्हा एकदा पारंपरिक मार्गाचा आधार घेत 'माठ' घराघरात आणला आहे. थंडगार पाण्यासाठी मातीचे माठ, सुरई आणि आकर्षक डिझाइनच्या मातीच्या बाटल्यांची मागणी अचानक वाढल्याने बाजारपेठा गजबजून गेल्या आहेत.



शहरातील विविध भागांतील मातीच्या वस्तूंच्या दुकानांवर ग्राहकांची झुंबड उडाली असून, विक्रेत्यांचाही चेहरा खुलला आहे. साध्या माठापासून ते रंगीबेरंगी नक्षीकाम केलेल्या बाटल्यांपर्यंत अनेक पर्याय उपलब्ध असून, 250 रुपयांपासून सुरू होणाऱ्या किमती 1000 रुपयांपर्यंत पोहोचल्या आहेत. तरीही मागणीत कोणतीही घट नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.विशेष म्हणजे, मातीच्या स्टायलिश बाटल्यांना तरुणांकडून जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. स्वतः रंगकाम करून या बाटल्यांना वैयक्तिक टच देण्याचा ट्रेंड वाढताना दिसतोय.

प्लॅस्टिकपासून दूर जात पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याकडेही नागरिकांचा कल झुकत असल्याचे दिसत आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पक्ष्यांसाठीही पाण्याची सोय करण्यास सुरुवात केली आहे. गच्ची, बाल्कनी आणि झाडांवर लहान मातीची भांडी ठेवून पक्ष्यांची तहान भागवण्याचा उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबवला जात आहे. सोसायट्या आणि सार्वजनिक ठिकाणीही यासाठी पुढाकार घेतला जात आहे.फ्रीजमधील अतिथंड पाण्यापेक्षा माठातील नैसर्गिक थंडावा शरीरासाठी अधिक फायदेशीर असल्याने नागरिक पुन्हा माठाकडे वळत आहेत.

**"आरोग्याचा नैसर्गिक फॉर्म्युला: माठातील पाणी"**

**"आरोग्याचा नैसर्गिक फॉर्म्युला: माठातील पाणी"आणि हे पाणी नैसर्गिकरीत्या थंड राहते. मातीच्या सूक्ष्म छिद्रांमुळे पाण्याचे तापमान संतुलित राहते, ज्यामुळे ते पचनासाठी उपयुक्त ठरते. अतिथंड पाण्यामुळे होणाऱ्या घशाच्या आणि पोटाच्या तक्रारी टाळण्यासाठी माठातील पाणी फायदेशीर मानले जाते. त्यामुळेच आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक पर्याय म्हणून माठ पुन्हा लोकप्रिय ठरताना दिसत आहे.**

**ग्राहक : संदीप जाधव**

मातीचा सौम्य स्वाद आणि आरोग्यदायी गुणधर्म यामुळे 'माठ' हा फक्त वस्तू न राहता जीवनशैलीचा भाग बनताना दिसत आहे.

# टेक्निप एनर्जीज इंडिया'ची दाहेज येथे पहिली खासगी जेट्टी सुरू; पहिले मॉड्युल युरोपकडे झाले रवाना

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी** : टेक्निप एनर्जीज इंडिया या कंपनीने गुजरातमधील दाहेज येथील आपल्या मॉड्यूलर मॅन्युफॅक्चरिंग यार्डमध्ये (एमएमवाय) पहिली खासगी जेट्टी नुकतीच सुरू केली. याच ठिकाणाहून मोठ्या आकाराच्या प्रोसेस मॉड्युलचा पहिला माल नेदरलँड्सला एका जागतिक ऊर्जा कंपनीसाठी पाठवण्यात आला. भारताच्या वाढत्या उत्पादनाच्या आणि निर्यात केंद्र म्हणूनच्या भूमिकेला बळ देणारा हा टप्पा असून तो 'मेक इन इंडिया'च्या उद्दिष्टाशी सुसंगत आहे.



या जेट्टीमुळे अतिशय मोठ्या आकाराचे मॉड्यूल थेट जहाजावर चढवता येते. प्रत्येक मॉड्यूलचे वजन सुमारे चार हजार मेट्रिक टनांपर्यंत आहे. यापूर्वी रस्त्याने वाहतूक करण्याच्या मर्यादांमुळे हे शक्य नव्हते. आता हे मॉड्यूल समुद्रमार्गे उत्तर युरोपकडे रवाना झाले असून ते लाल समुद्र आणि सुएझ कालवा यामार्गे पोहोचणार आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर अखंडीत व सुरळीत वाहतूक सुनिश्चित झाली आहे.

या सुविधेमुळे वाहतूक व्यवस्था अधिक कार्यक्षम झाली आहे. पूर्वी रस्त्याने माल पाठवण्यासाठी अंदाजे १५ दिवस लागत होते; आता तोच वेळ फक्त ४८ ते ७२ तासांपर्यंत कमी झाला आहे. यामुळे सुमारे ६० ते ७० टक्के इंधनाची बचत होत असून वाहतूक खर्चही कमी झाला आहे. तसेच कार्बन उत्सर्जनातही लक्षणीय घट झाली आहे. त्यामुळे 'टेक्निप एनर्जीज इंडिया'ची शाश्वत आणि पर्यावरणपूरक कामकाजाची बांधिलकी अधिक बळकट झाली आहे.सुमारे सात महिन्यांच्या वेगवान कालावधीत ही जेट्टी पूर्ण करण्यात आली. अंमलबजावणीची उत्तम क्षमता आणि अभियांत्रिकी कौशल्याचे हे उदाहरण आहे. याशिवाय, या प्रकल्पामुळे टेक्निप एनर्जीजच्या जागतिक मॉड्यूलर अंमलबजावणी धोरणात भारताला अग्रस्थान मिळाले आहे. त्यामुळे मोठ्या आणि गुंतागुंतीच्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पांसाठी पात्र ठरणे आणि ते यशस्वीपणे पूर्ण करणे कंपनीला शक्य होणार आहे.

या महत्त्वपूर्ण टप्प्याबाबत बोलताना 'टेक्निप एनर्जीज'च्या भारत व आशिया पॅसिफिक क्षेत्राचे व्यवस्थापकीय संचालक देवेंद्र कुमार म्हणाले, "एमएमवाय–दहेज येथील जेट्टी सुरू होणे आणि पहिला माल यशस्वीपणे पाठवणे हा 'टेक्निप एनर्जीज़ इंडिया'साठी महत्त्वाचा टप्पा आहे. अधिक जलद, कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक कामकाज मोठ्या प्रमाणावर शक्य करून आमच्या टीमने उत्कृष्ट वितरण आणि जागतिक दर्जाच्या सुरक्षा मानकांचे पालन यांना नवी उंची दिली आहे.

# पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनची एकी कौतुकास्पद : डॉ. गिरीश गुणे

■ डॉक्टरांचे जीवन कष्टमय : रामशेठ ठाकूर
■ शंभरावी सीएमई नव्या पर्वाची नांदी ठरेल : महेंद्रशेठ घरत



**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी** : "संघटनेच्या माध्यमातून सगळे एकत्र आल्याने सगळ्यांचा फायदा होतो. सामाजिक गरजांबरोबरच बौद्धिक गरजही सीएमईमार्फत भागविली जात आहे. वैद्यकीय ज्ञानाबरोबरच सामाजिक भान ठेवून काम करणे, ही गोष्ट अधिक महत्त्वाची आहे. संघटनेच्या सभासदावर जर दुर्दैवी प्रसंग ओढवला तर त्याला संघटनेच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे आर्थिक सहकार्य केले जाते, ही बाजू जमेची आहे. त्यामुळे संघटनेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनची एकी ही कौतुकास्पद आहे, असे सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे म्हणाले.

पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वतीने नवी मुंबईतील ताज विवांता हाटेल येथे रविवारी (ता. २६) शंभरावी सीएमई आयोजित करण्यात आली होत्या. त्यावेळी डॉ. गुणे बोलत होते.

या सीएमईचे उद्घाटन डॉ. गिरीश गुणे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत, पनवेलचे महापौर नितीन पाटील, माजी महापौर जे. एम. म्हात्रे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अपर्णा पवार, महापालिका वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी आदींच्या उपस्थितीत झाले. यावेळी शेकडो डॉक्टर उपस्थित होते. यावेळी डॉ. वसंत पाटील यांना 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

"डॉक्टर मंडळी एकत्र येतायत, विचारांची देवाण-घेवाण करतायत आणि सामाजिक बांधिलकीही जपतायत. व्यवसाय करताना त्याला मनोरंजनाचीही जोड देतात, ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे. डॉक्टरांचे जीवन कष्टमय असते. त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी असते. मी शिक्षकी पेशातून आलोय, त्यामुळे मला जाणीव आहे की आमच्यापेक्षा आपले जीवन खडतर आहे. डोळ्यांत तेल घालून काम करावे लागते. थोडीशी चूक डॉक्टरांना खूप महागात पडते. देशात वा राज्यात जेव्हा कठीण परिस्थिती उदभवते, तेव्हा डॉक्टरांचे योगदान निश्चतच वाखाणण्याजोगे असते. कोरोना काळात याची प्रचिती सर्वांना आलेली आहे," असे माजी खासदार रामशेठ ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना म्हणाले.

यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, "वैद्यकीय क्षेत्रातील देव म्हणून डॉक्टर गिरीश गुणे आणि सामाजिक क्षेत्रातील आधारवड माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांच्या उपस्थितीने आजच्या सीएमईला चार चांद लागले आहेत. त्यांची उपस्थिती संघटनेच्या बळकटीकरणाला प्रोत्साहन देणारी आहे. त्यामुळे शंभरावी सीएमई नव्या पर्वाची नांदी ठरेल. जीवनाच्या रहाटगाड्यात, ताणतणावाच्या आयुष्यात आपल्यात असंख्य गुणही आहेत, ते आपण विसरून गेलो आहोत.

# निफाडमध्ये कृषी निविष्ठा दुकाने बेमुदत बंद; प्रशासनाला निवेदन

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : निफाड तालुक्यात कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी राज्यव्यापी आंदोलनात सहभागी होत दि. 27 एप्रिल 2026 पासून बेमुदत बंद पुकारला आहे. निफाड तालुका ॲग्रो डिलर्स असोसिएशनच्या वतीने हा निर्णय जाहीर करण्यात आला असून, या पार्श्वभूमीवर पंचायत समितीचे कृषी अधिकारी मोगल, तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार आणि तहसीलदार विशाल नाईकवाडे यांना निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टिसाइड्स आणि सीड्स डिलर्स असोसिएशनच्या आवाहनानुसार राज्यभर हा बंद पाळला जात असून, निफाड तालुक्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्रेते आंदोलनात सक्रिय सहभागी झाले आहेत. शासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय न घेतल्यास हा बंद बेमुदत सुरूच ठेवण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

**मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे:**

कंपन्यांकडून होणाऱ्या 'लिंकिंग' पद्धतीला विरोध

अनधिकृत एजंटमार्फत होणारी विक्री तात्काळ थांबवावी

खत व कीटकनाशक विक्रीवरील कडक नियम शिथिल करावेत

नवीन नियमांमुळे वाढलेला प्रशासकीय ताण कमी करावा

शेतकऱ्यांच्या नुकसानीसाठी दुकानदारांना जबाबदार धरणे थांबवावे

अनधिकृत बीटी बियाणे विक्रीवर नियंत्रण आणावे

या वेळी संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब माधवराव जाधव, उपाध्यक्ष रामभाऊ यशवंतराव माळोदे, सरचिटणीस



जयवंत सुखदेव कापसे, सहसरचिटणीस प्रल्हाद संपतराव खडांगळे, खजिनदार ईश्वर रामभाऊ जाधव यांच्यासह संचालक मंडळातील श्रीराम पंडित ढोमसे, रामदास पंढरीनाथ टरले, विनायक कुशारे, प्रमोद गांधी, मनोज कापडी, ज्ञानेश्वर कार्लेकर, रावसाहेब माळोदे, अशोक पाल्हाळ, हरीश मोरे, देविदास शिंदे, अनिरुद्ध जाधव, संदीप भोसले यांची उपस्थिती होती.

तसेच तालुक्यातील विविध भागांतील विक्रेते आणि शेतकरी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये सतीश खांडे (पिंपळगाव बसवंत), सतीश बोंबले (चितेगाव फाटा), विक्रम तासकर, उमेश पाटील, अनिल पाटील, शरद वाघ, वासुदेव काठे, प्रमोद मोरे, योगेश सूर्यवंशी, रमेश दराडे, रवींद्र आव्हाड, मनोहर डेरले, घुमरे साहेब, दीपक कापडी, अजित मोगल, बापूसाहेब गायकवाड, अजब सिंग, संदीप राजवळ, श्याम वाघ, अश्विन डोंगरे तसेच कर्मचारी नितीन दुसाने यांचा समावेश होता.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील कृषी निविष्ठा दुकाने बंद राहिल्याने शेतकऱ्यांना तात्पुरत्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र, शासनाने मागण्यांवर तातडीने निर्णय घेतल्यास परिस्थिती लवकर सुरळीत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ग्रीन नेचर फाउंडेशन तर्फे नेचर पार्कवर जागतिक वसुंधरा दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीयाभंडारा जिल्हा प्रतिनिधी** : लाखनी येथील ग्रीन नेचर फाउंडेशन अर्थात (ग्रीनफ्रेंड्स नेचर क्लब) लाखनी तर्फे दरवर्षी प्रमाणे यावर्षी लाखनी निसर्गमहोत्सवाच्या निमित्ताने सुद्धा नेचर पार्कवर जागतिक वसुंधरा दिन विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ नागरिक सेवानिवृत्त डॉ.पंढरीनाथ इलमकर, भैय्याजी बावनकुळे,रामकृष्ण गिऱ्हेपुंजे तसेच अशोक वैद्य, ताजुश शरिया कोचिंग क्लासेसचे संचालिका मिनाझ मोटलानी,अशोक नंदेश्वर ,कार्यक्रम आयोजक ग्रीन नेचर फाउंडेशनचे कार्यवाह प्रा. अशोक गायधने यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळी प्रा.अशोक गायधने सरांनी जागतिक वसुंधरा दिनाची संपूर्ण पार्श्वभूमी समजावून देत पृथ्वी संरक्षणाची आवश्यकता समजावून दिली. सर्वच प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांमध्ये बालवयापासून स्पर्धेच्या माध्यमातून पर्यावरण जागृती तयार होत आहे याबद्दल प्रशंसा केली.यानंतर सर्वांना पर्यावरण सेवा योजना 6.0 माझी वसुंधरा अंतर्गत पर्यावरण शपथ मराठी व हिंदी भाषेतून देण्यात आली.

यावेळी पृथ्वी दिनावर वर आधारित पोस्टर तसेच घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन नेचर पार्कवर ताजुश शरिया कोचिंग क्लासेसच्या सहकार्याने करण्यात आले.या स्पर्धेत हायस्कूल




गटात प्रथम क्रमांक देव्यांशी गुरुनानी हिला तर द्वितीय क्रमांक मिताली गायधनी व याशी वंजारी यांना तर तृतीय क्रमांक जानवी निर्वाण यांना प्राप्त झाला. मिडलस्कुल गटात प्रथम क्रमांक निराली वंजारी व परिधि भोंगाडे यांना तर द्वितीय क्रमांक साक्षी भिवगडे व आराध्या सेलोकर तर तृतीय क्रमांक ओमराज जाधव यांना प्राप्त झाला. प्रायमरी गटात प्रथम क्रमांक लावण्या निर्वाण हिला तर द्वितीय क्रमांक मरियम आकबानी यांना तर प्रोत्साहनपर क्रमांक नायरा पाटील व सुमती बजाज , अभिधा थोटे यांना प्राप्त झाला. घोषवाक्ये बनवा स्पर्धेत मिताली गायधनी हिला प्रथम तर जानवी निर्वाण हिला द्वितीय तर याशी वंजारी व निराली वंजारी यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाला. तसेच प्रायमरी गटात नायरा पाटील व लावण्या निर्वाण हिला प्रथम तर मरियम आकबानी हिला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. स्पर्धेचे परीक्षण मिनाझ मोटलानी व ज्येष्ठ नागरिक व उपाध्यक्ष भैय्याजी बावनकुळे यांनी केले.कार्यक्रमाचे संचालन अशोक वैद्य तर आभार प्रदर्शन मिनाझ मोटलानी, अशोक नंदेश्वर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी लाखनी नगरपंचायतचे क्रियाशील नगरसेवक संदीप भांडारकर,डॉ. मनोज आगलावे, डॉ. योगेश गिऱ्हेपुंजे, डॉ.प्रमोद इमदेव देशमुख ,डॉ. छगन राखडे, डॉ. दिपक नवखरे, डॉ . दिलीप अंबादे, कोनगाव पोलिस स्टेशन मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नेताराम मस्के, भैय्याजी कृषक सेवा केंद्रचे भैय्याजी बावनकुळे, सेवानिवृत्त प्राचार्य अशोक हलमारे, माधवराव भोयर, प्राचार्य प्रदीप गायधनी, शिक्षिका वैशाली गायधनी, नाना वाघाये, सेवानिवृत्त कलाशिक्षक दिनकर कालेजवार, सर्पमित्र पंकज भिवगडे, मयूर गायधने, सलाम बेग, दर्वेश दिघोरे, सरीसृप संशोधक विवेक बावनकुळे, नितीन निर्वाण, खेमराज हुमे, साकोली सर्पमित्र युवराज बोबडे, रोशन बागडे, निर्वाण इलेक्ट्रिकलचे भूपेंद्र निर्वाण इत्यादीनी अथक परिश्रम घेतले.

# मालेगावात वाढत्या उष्णतेचा इशारा; तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांचे सतर्कतेचे आवाहन!

**दैनिक युवक आधार वाशीम**
**करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : सध्या वाढत्या तापमानामुळे मालेगाव परिसरात उष्णतेचा तडाखा अधिक तीव्र होत असून शेतात व क्षेत्रीय काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी धोका वाढला आहे. याच पार्श्वभूमीवर कृषी विभाग महाराष्ट्र शासन कडून महत्त्वपूर्ण सूचना जारी करण्यात आल्या आहेत.




युवा तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांनी परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत शेतकरी व कृषी विभागातील कर्मचाऱ्यांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या पुढाकारातून मालेगाव तालुक्यात जनजागृती सुरू असून सुरक्षित शेतीकामावर विशेष भर दिला जात आहे. कैलास देवकर यांनी सांगितले की, "उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे उष्माघाताचा धोका वाढतो, त्यामुळे प्रत्येकाने खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे."

सूचनांनुसार दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो शेतातील काम टाळावे. सकाळी लवकर किंवा संध्याकाळी काम केल्यास शरीरावर ताण कमी पडतो. हलके, सैल व पूर्ण अंग झाकणारे कपडे वापरणे, टोपी, गॉगल व छत्रीचा वापर करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.

पाण्याचे योग्य प्रमाणात सेवन करणे ही अत्यंत महत्त्वाची बाब असून दर ३० ते ४५ मिनिटांनी पाणी पिणे, ORS, लिंबूपाणी किंवा ताक घेणे फायदेशीर ठरते. कैलास देवकर यांनी स्पष्ट केले की, "डिहायड्रेशन टाळणे हीच सर्वात मोठी सुरक्षितता आहे. नियमित पाणी पिल्यास शरीर ताजेतवाने राहते."

आरोग्याच्या दृष्टीने चक्कर, डोकेदुखी, अशक्तपणा जाणवल्यास तात्काळ विश्रांती घ्यावी. एकट्याने काम न करता सहकाऱ्यांसोबत काम करावे,

**"उन्हाचा वाढता तडाखा लक्षात घेता प्रत्येकाने स्वत:ची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. योग्य पाणी, संतुलित आहार आणि योग्य वेळेत काम केल्यास आपण उष्णतेवर मात करू शकतो. सुरक्षित राहणे हीच खरी प्रगती आहे."**
**— कैलास देवकर**
**तालुका कृषी अधिकारी, मालेगाव**

मोबाईल पूर्ण चार्ज ठेवावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

आहारामध्ये हलका, पौष्टिक व पचायला सोपा आहार घ्यावा. फळे, ताक व नारळपाणी यांचा समावेश करावा. उष्माघाताची लक्षणे दिसल्यास संबंधित व्यक्तीला सावलीत नेऊन पाणी किंवा ORS देऊन तात्काळ वैद्यकीय मदत घ्यावी, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.


युवा तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांच्या मार्गदर्शनामुळे मालेगाव तालुक्यात सकारात्मक जनजागृती होत असून शेतकरी व कर्मचारी अधिक सजग होत आहेत. सुरक्षित शेतीकामाचा संदेश प्रभावीपणे पोहोचत आहे.

# लॉटरी विक्रेत्यांची कंपनीवर धडक

## राजश्री ऑनलाईनवर बहिष्काराचा इशारा : सातार्डेकर

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी गुरुनाथ तिरपणकर** : राजश्री पेपर लॉटरी आडून ' बुक माय राजश्री या ऑनलाईन लॉटरीची यंत्रणा बेकायदा चालविणाऱ्या सेरेनिटी ट्रेडर्स कंपनीने येत्या आठवडयात हा प्रकार बंद करावा अन्यथा उभ्या महाराष्ट्रभरात राजश्री पेपर लॉटरीवर लॉटरी विक्रेते हे 'विक्री बंद'चे हत्यार उचलून बहिष्कार घालतील, असा सज्जड इशारा लॉटरी विक्रेत्यांचे तडफदार नेते श्री. विलास कृ.सातार्डेकर यांनी दिला .विक्रेते, वितरक यांच्या न्याय हक्कांसाठी आता आंदोलन अधिक उग्र करण्याचीही मनोदय त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र लॉटरी विक्रेता संघटनेने शुक्रवारी सकाळी विक्रोळी येथील सेरेनिटी ट्रेडर्स या कंपनीच्या कार्यालयात धडक दिली आणि 'बुक माय राजश्री 'चे कामकाज बंद पाडले. मुंबई शहर आणि उपनगरातील हजारो लॉटरी विक्रेत्यांनी घोषणांनी सारा परिसर दुमदुमून टाकला . राज्य लॉटरी आमच्या हक्कांची; नाही ' राजश्री' च्या बापाची! असा दणका दिला.यात अंध,अपंग, विधवा, वयोवृद्ध, बेरोजगार,






महिला यांनी ऑनलाईन राजश्री लॉटरीच्या निषेधाने फलकही फडकावला ! यावेळी संघटनेचे संस्थापक / अध्यक्ष सातार्डेकर यांनी विक्रेत्यांच्या उग्र भावना मांडल्या आणि कंपनीला जाब विचारला.

ऑनलाईन राजश्रीची विक्री करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केवळ टोलवा टोलवीची उत्तरे दिली. सारं काही कायदेशीर चालू आहे,असे प्रियेश शाह,जयेश माणिक,मयूर लखानी,शरद जाधव यांनी कंपनीतर्फे शिष्टमंडळाला सांगितले . गेली अनेक महिने पत्रव्यवहार व प्रत्यक्ष भेटीतून कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही .त्यात अजून दिरंगाई ही संतापजनक आहे ! असेही सातार्डेकर यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले.प्रामाणिकपणे राज्य लॉटरी विकणाऱ्या लॉटरी विक्रेत्यांची विक्री ही दिवसें दिवस मंदातली आहे. 'राजश्री ऑनलाईन ' मूळे कंपनी आणि ग्राहक यांच्या हातातच आता सारं काही उरलय. यात विक्रेते, वितरक हे दुर्लक्षित झालेत. बेकारीचे संकट यामुळे लॉटरी विक्रेत्यांपूढे उभे ठाकलय! असे संघटनेचे कार्यध्यक्ष सुमित सातार्डेकर यांनी यावेळी स्पष्ट केले. विक्रोळी येथील राजश्री लॉटरी कार्यालयावर दिवसभर चाललेल्या या आंदोलनात प्रभारी सरचिटणीस कमलेश विश्वकर्मा, उपाध्यक्ष संजय नारीग्रेकर,अशोक नलावडे,मुंबई अध्यक्ष विनोद गाडेकर,सचिव संजय शेट्ये आणि पदाधिकारी विद्याधर गायकवाड, सूर्यकांत ( बाबू ) धावले, उदय चेऊलकर, महेश कोळी, गणेश खैरे, ऋत्विका बोरकर, संभाजी डोंगरे, भिकाजी हांडे, जगन्नाथ परब, शांताराम पाटील, विष्णू पाटील, अँड. दिग्विजय राणे हे उपस्थित होते राजश्री चे कामकाज निदर्शक विक्रेत्यांनी पूर्णपणे बंद पाडले.

# सार्वजनिक स्वच्छतेचे भारतीयांना का असे वावडे?

मुळात स्वच्छता प्रत्येकानेच राखायला हवी. मात्र, यासाठी सरकारला जाहिरात करावी लागते, ठिकठिकाणी होर्डिंग्ज, बॅनर लावावे लागतात, प्रसार माध्यमांतून तसेच समाज माध्यमातून सतत स्वच्छतेचा जागर करावा लागतो. तरीही पालथ्या घड्यावर पाणीच असते. एक दिवस सफाई कामगार आले नाहीत तर रस्ते, गल्ली, चौक, मैदाने आदी सर्वत्र कचरा दिसू लागतो. आपण स्वच्छतेच्या सवयी न पाळल्यामुळे जागोजागी कचरा होतो, परिसर घाणेरडा दिसतो आणि तो स्वच्छ करण्यासाठी स्वच्छता मोहीम राबवावी लागते, यापेक्षा आपले दुर्दैव ते कोणते? स्वच्छ राहा, स्वच्छता राखा हे सांगावे लागते आणि त्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागत असतील तर आपण भारतीय काय योग्यतेचे आहोत, हे कळले पाहिजे.

रस्त्यातून चालता चालता काहीतरी खायचे आणि त्याचे आवरण किंवा फळांची साले, प्लास्टिकची पिशवी, कागदाचे कपटे तसेच फेकून देणे, यात आपल्याला चुकीचे काहीच वाटत नाही. किंबहुना ही कृती अगदी सहजपणे आपल्याकडून होते. आपण रस्त्यात घाण करतो, कचरा टाकतो, कुठेही थुंकतो हे सर्व इतक्या सफाईने केले जाते की अचानक याची कुणीतरी जाणीव करून दिली तर लाज वाटायची सोडून लगेच आपला अहंकार दुखावला जातो. हा सार्वजनिक रस्ता आहे, मी रस्त्यात काही टाकले तर तुम्हाला काय त्रास होतो? किंवा सफाई कामगार आहेत की साफसफाईसाठी किंवा तुम्हाला त्रास होत असेल तर मलबार हिल किंवा नरिमन पॉइंटला राहायला जा, थेट असे सुनावले जाते. स्वच्छतेबाबतच्या बेफिकिरीमुळे या देशाला दरवर्षी कित्येक हजार कोटींचा भुर्दंड नाहक सहन करावा लागतो. हा पैसा आपलाच कररुपातून भरलेला असतो आणि या अस्वच्छतेचा त्रास आणि मनस्ताप विनाकारण सर्वांनाच सहन करावा लागतो.

मुळात स्वच्छता प्रत्येकानेच राखायला हवी. मात्र, यासाठी सरकारला जाहिरात करावी लागते, ठिकठिकाणी होर्डिंग्ज, बॅनर लावावे लागतात, माध्यमांच्या माध्यमातून तसेच समाज माध्यमातून सतत स्वच्छतेचा जागर करावा लागतो. तरीही पालथ्या घड्यावर पाणीच असते. एक दिवस सफाई कामगार आले नाहीत तर रस्ते, गल्ली, चौक, मैदाने आदी सर्वत्र कचरा दिसू लागतो. आपण स्वच्छतेच्या सवयी न पाळल्यामुळे जागोजागी कचरा होतो, परिसर घाणेरडा दिसतो आणि तो स्वच्छ करण्यासाठी कधीतरी स्वच्छता मोहीम राबवावी लागते, यापेक्षा आपले दुर्दैव ते कोणते? स्वच्छ राहा, स्वच्छता राखा हे सांगावे लागते आणि त्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागत असतील तर आपण भारतीय काय योग्यतेचे आहोत, हे कळले पाहिजे. परदेशात जाऊन आल्यावर तिकडच्या स्वच्छतेचे, नियमांचे आणि नियम तोडणाऱ्यांवर होणाऱ्या कारवाईचे आपण तोंड भरून कौतुक करतो. मात्र, भारतात परतल्यावर त्याच तोंडातून रस्त्यावर पान किंवा गुटखा खाऊन पिचकारी मारतो, तेव्हा ते कौतुक कुठे जाते? ज्या देशात स्वच्छता मोहीम राबवावी लागते,



स्वच्छतेसाठी क्लीनअप मार्शल ठेवावे लागतात, दरवर्षी हजारो रुपयांचा चुराडा करून नालेसफाई करावी लागते, यापेक्षा मोठे अपयश काय असू शकते? आता दीड-दोन महिन्यांनी पावसाला सुरुवात होईल. तत्पूर्वी नालेसफाई करून घेण्याचा शिरस्ता पडला आहे. नालेसफाई न झाल्यास नाले तुंबून शहराची वाट लागेल, असे नेहमी सांगितले जाते. नालेसफाईनंतरही फार काही वेगळे चित्र नसते. हे सर्व का होते, याचा कुणी विचार केला आहे का? मुळात नालेसफाईची वेळ का येते, त्यावर हजारो कोटी का खर्चावे लागतात, याचा कुणीही गांभीर्याने विचार करत नाही.

आपण फार लांब जाण्याची गरज नाही. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, नवी मुंबई, मिरा भाईंदर, वसई-विरार आणि पनवेल या ९ महापालिकांचा विचार केला तरी स्वच्छता आणि अस्वच्छता यांच्यातील फरक स्पष्ट होईल. यंदा या ९ महापालिकांच्या हद्दीतील नालेसफाईवर तब्बल ४५० कोटींचा खर्च केला जात आहे. कारण येथील नाल्यांमध्ये खूप कचरा साठला आहे, प्लास्टिकच्या पिशव्यांचे थर जमले आहेत, लोक घरातील घाण थेट नाल्यात टाकतात, बांधकाम करणारे डेब्रिस गुपचूप नाल्यात टाकतात. परिणामी नाले तुंबतात आणि पावसाळ्यापूर्वी त्यांची सफाई न केल्यास पावसाळ्यात नाले तुंबून घरात पाणी येण्याचा धोका वाढतो. म्हणजे नाले तुंबवणारे आपणच आणि नंतर त्यांची सफाई करण्यासाठी आपणच भरलेल्या कररुपी पैशाचा वापर केला जातो, याचे भानही आपल्याला नसते. म्हणजे स्वच्छतेबाबत कितीही जागरुकता निर्माण केली तरी अजिबात सुधारायचे नाही, असा जणू विडा उचलल्यासारखे सर्वजण वावरताना दिसतात. वास्तविक आपले घर आणि आपला परिसर स्वच्छ ठेवा, हे सांगायची अजिबात गरज पडता कामा नये, कचरा कायम कचराकुंडीतच टाकला पाहिजे याची जाणीव सर्वांना असायलाच हवी. पण आपल्याकडे सर्व उलटेच आहे. म्हणजे स्वच्छ महापालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायतींना स्वच्छतेचा पुरस्कार दिला जातो. त्याऐवजी ज्या महापालिका, नगर परिषदा, ग्रामपंचायती अस्वच्छ आहेत, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई का केली जात नाही, गाव-शहर स्वच्छ राहण्यासाठी तशा उपाययोजना का केल्या जात नाहीत, याचा विचार व्हायला हवा.

वर उल्लेख केलेल्या कुठल्याही महापालिका हद्दीत गेल्यास सार्वजनिक शौचायलाचा शोध घ्यावा लागतो. सार्वजनिक शौचालय नसल्यास बाहेर असणारे लोक कुठल्यातरी कोपऱ्याचा आधार घेतात. त्या कोपऱ्यात खूप घाण झाली की त्यावर उपाय म्हणून तिथलेच लोक देवांचे फोटो किंवा टाईल्स तिथे लावतात म्हणजे तिथे कुणी कुठले विधी करू नये, थंकू नये! मात्र, अशी वेळच येऊ नये, हे पाहणे महत्त्वाचे आहे. राज्यात गुटखा बंदी आहे. मात्र, डोळे उघडे ठेवल्यास जागोजागी पानाच्या टपऱ्यांवर गुटखा मिळतो आणि ते खाणारे जागोजागी थुंकत असतात, हेही दिसते. मात्र, हे सरकारला दिसत नाही. गुटखा बंदी असूनही राज्यात गुटखा विक्रीसाठी येतोच कसा? काही दिवसांपूर्वी भिवंडी महापालिका हद्दीत गुटखा पकडला होता. पोलिसांनी तो नष्ट करण्यासाठी जमिनीत पुरला आणि गुटखेवाल्यांनी तो गुटखा पुन्हा बाहेर काढला. म्हणजे अशा पद्धतीने कारवाई होणार असेल तर याला काय म्हणायचे? मुळात ही कारवाई नव्हती तर गुटखेवाल्यांना त्यांचा माल परत देण्याची ती सोय होती, हे सर्वांच्या लक्षात आले होते.

ठराविक पातळ असलेल्या प्लास्टिकच्या पिशव्यांवर बंदी आहे. त्यामुळे महापालिकांचे अधिकारी कधीकधी दुकांनावर छापे टाकून प्लास्टिकच्या पिशव्या पकडतात आणि दुकानदारांना दंड ठोठावतात. मात्र, सरकार ज्या पिशव्यांवर बंदी आहे त्यांची निर्मिती करणाऱ्या फॅक्टऱ्या का बंद करत नाही? रोग मुळापासून नष्ट न करता आजार झाल्यावर थातूरमातूर उपाय करण्यावर भर दिला जात आहे. आपल्याकडील नद्यांना गटाराचे स्वरुप प्राप्त झाले आहे. शहरातील, गावातील नाले नदीत सोडले जात आहेत, रासायनिक कंपन्यांकडून सोडण्यात येणारे सांडपाणी प्रक्रियेशिवाय नाले किंवा नदीत सोडले जाते. त्यामुळे नदी-नाले प्रदूषित होत आहेत. म्हणजे एकीकडे स्वच्छ भारत मिशन राबवायचे आणि दुसरीकडे नद्यांमध्ये बेधडक रसायने सोडणाऱ्यांवर कोणताही कारवाई करायची नाही, यातून काय साध्य होणार आहे?

भारतीय स्वच्छतेचा आणखी एक दाखला द्यायचा तर स्वच्छ भारत मिशनचा द्यावा लागेल. यात स्वच्छ पाणी, शौचालय, कचऱ्याची व्यवस्था आदींचा समावेश आहे. यंदा स्वच्छ भारत मिशनसाठी केंद्र सरकारने ९ हजार ६७२ कोटींची तरतूद केली आहे. यात ग्रामीण भागासाठी ७ हजार १९२ कोटी आणि शहरी भागासाठी २ हजार ४८० कोटींची तजविज आहे. मुळात स्वच्छता हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे, हे आपल्याला वारंवार का सांगावे लागत आहे, याचा कुणीच विचार करत नाही. प्रत्येकाने आपला घर, परिसर स्वच्छ ठेवला, कचराकुंडीतच कचरा टाकला, रस्ता, मैदान किंवा कुठल्याही सार्वजनिक ठिकाण घाण केली नाही तर आपलाच पैसा वाचेल आणि त्याचा उपयोग आपले जीवनमान सुधारण्यासाठी, आरोग्याचा स्तर उंचावण्यासाठी होऊ शकतो. मात्र, घाण करणे माझा जन्मसिद्ध हक्क आहे, असे समजून वागणाऱ्यांमुळे सर्वांचेच नुकसान होत आहे. केवळ चांगल्या सवयी नसल्यामुळे किंवा तशा सवयी अंगिकारण्याची पात्रता नसल्याने केलेली घाण साफ करण्यासाठी देशात हजारो कोटी रुपयांचा चुराडा होत आहे. आपल्या अंगात प्रचंड अस्वच्छता भिनली आहे. भारत हा जगातील कदाचित एकमेव देश असेल जो स्वच्छतेची महती सांगतो आणि सर्व भारतीय आवर्जून अस्वच्छतेचा पुरस्कार करतात. विदेशात मात्र स्वच्छता हा जीवनाचा भाग आहे. भारतात तो जीवनाचा भाग कधी बनणार ?

**- अविनाश चांदणे**

# बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत. या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात. उष्माघाताने काहींचा जीवही गेला आहे. तीन वर्षापूर्वी खारघरमध्ये घडलेली घटना अजूनही ताजीच आहे. उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकरांना जीव गमवावा लागला होता. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पुढील काही दिवस राज्यातीलच नव्हे तर देशातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षातील नित्याची बाब झाली आहे. केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशातील अन्य राज्यातही अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

देशातील काही भागात मुसळधार पाऊस देखील पडत आहे याचाच अर्थ देशातील एका भागात कडाक्याचे उन तर दुसऱ्या भागात मुसळधार पाऊस अशी विषम परिस्थिती आहे. कडाक्याचे ऊन, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ या घटना आताच घडतात असे नाही तर वर्षभर घडत असतात. महाराष्ट्र हे सह्याद्रीच्या कुशीत वसले आहे. पूर्वी सर्व ऋतूंचे आगमन वेळेवर होत होते. मागील काही वर्षात ऋतुमानात मोठे बदल पाहायला मिळत आहे. ऋतुमानच बदलले आहे. पूर्वी पाऊस फक्त पावसाळ्यातच पडत असे आता वर्षभर कोठेना कोठे पाऊस पडताना दिसतो. पावसाळ्यात दोन दोन महिने पाऊस पडत नाही. कधीकधी दोन दिवस इतका पाऊस पडतो की दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी भरून काढतो. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे याबाबत शेतकरी संभ्रमात असतो. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. काँक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत. निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.



**श्याम ठाणेदार**